बुधवार, १० एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 10 APRIL 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-225 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05

# भ्रष्ट तितुका मेळवावा, भाजप पक्ष वाढवावा

## उद्धव ठाकरे : महाविकास आघाडीतील जागा वाटप जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : 'भ्रष्ट तितुका मेळवावा, भाजप पक्ष वाढवावा' असा भाजप पक्ष झाला आहे. महाराष्ट्रातील लोकांना खरी शिवसेना माहित आहे. त्यांनी त्यांच्याजवळ चायनीझ माल ठेवावा. भाजप पक्ष खंडणीखोर झाला असून 'चंदा दो धंदा लो' असे यांचे काम आहे. खंडणीखोर नेत्यांनी असे शिवसेनेला हिणवणे योग्य नाही. नरेंद्र मोदी म्हणजे भेकड पक्षाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्यावर टीका करणारच, असा हल्लाबोल शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी केला. महाविकास आघाडीतील जागा वाटप जाहीर झाल्यानंतर पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी आपण पंतप्रधान म्हणून नव्हे तर एक व्यक्ती म्हणून नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणार असल्याचे स्पष्ट केले.**

मंगळवारी महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष कार्यालय 'शिवालय' येथे पार पडली. यामध्ये जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला जाहीर करण्यात आला. त्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात आदींसह इतर घटक पक्षांचे नेते उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत पुढे म्हटले की, महाविकास आघाडी व्यापक होईल यासाठी प्रयत्न आम्ही केले. प्रकाश आंबेडकर यांना काही जागा देऊ केल्या होत्या. आता ते काही जरी बोलले तरी आम्ही काही बोलणार नाही. आम्हाला अजूनही त्यांच्याबद्दल आदर असल्याचे त्यांनी म्हटले. भाजपवर निशाणा साधताना उद्धव यांनी म्हटले की, सोमवार, 8 एप्रिल रोजी तीन गोष्टीचा एकत्रित योग होता. अमावस्या




होती, ग्रहण होत आणि यांची सभा होती. काल जे भाषण झाले ते पंतप्रधान यांचे भाषण नव्हते. ते भेकड जनता पक्षाचे नेते मोदी यांचे भाषण होते. भाजपमध्ये ताकद नाही म्हणून भेकड म्हणत असल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

**महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा असा ठरला फॉर्म्युला**

**ठाकरे गट** : 21 जागा
**काँग्रेस** : 17 जागा
**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष** : 10 जागा

सांगली, भिवंडी, मुंबईतील जागांसह उर्वरित जागांवर कोणता घटक पक्ष निवडणुकीत आपला उमेदवार उतरवेल याचीही माहिती या संयुक्त पत्रकार परिषदेत देण्यात आली आहे . सांगलीची जागा ठाकरे गट लढवणार असून भिवंडी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे देण्यात आली आहे . तर मुंबईतील सहा मतदारसंघांपैकी दोन जागा काँग्रेस लढवणार असून उर्वरित चार जागा ठाकरे गटाला सुटल्या आहेत .

# आपल्या एका मताने परिवर्तनाची तुतारी महाराष्ट्रात निनादू शकते

## जयंत पाटील यांचे जनतेला आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जयंत पाटील यांनी गुढी पाडव्याच्या निमित्ताने जनतेला पत्र लिहिले आहे. आपल्या राज्यातील संस्कृती, महापुरुषांचे योगदान या सर्व गोष्टींवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. तसेच राज्याच्या सुरु असलेल्या अधोगतीकडेही त्यांनी या पत्राद्वारे सामान्य जनतेचे लक्ष वेधले आहे. अनेक महापुरुषांचा वारसा असणारे आपले महाराष्ट्र हे अत्यंत सभ्य, सुसंकृत राज्य आहे. या राज्यात आपण जन्मलो हे आपले भाग्य. अठरापगड जातींना सोबत घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. संतांच्या वाणीने पावन झालेल्या भूमित जसे महाकाय सह्याद्री आणि विशाल अरबी समुद्र एकत्र नांदले. तसेच अनेक धर्म, भाषा, साहित्य, संस्कृती एकत्र नांदल्या आणि भरभराटीस आल्या. येथे राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी वीरतेची कथा लिहिली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री-पुरुष समानतेची तोरणे बांधली. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी स्त्रीयांचा मळवट शिक्षणाने भरला. छत्रपती शाहू महाराज यांनी समाजातील विषमतेच्या रेखा पुसट केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर स्वातंत्र्यानंतर घटनेतच समानतेचा अधिकार दिला. हा सर्वसमावेशक समृद्ध वारसा पुढे नेणारे महाराष्ट्र संपूर्ण देशासाठी दिशादर्शक राज्य ठरले. येणाऱ्या लोकसभा निवडणूकीत आपल्या एका मताने परिवर्तनाची तुतारी संपूर्ण महाराष्ट्रात निनादू शकते.

# पंतप्रधानांच्या उपस्थितीत मुनगंटीवारांचे भडकाऊ भाषण


## कारवाई करण्यासाठी काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे वन मंत्री व भारतीय जनता



पक्षाचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधान मोदींसाठी आयोजित सभेत सर्व मर्यादा पार केल्या. मुनगंटीवार यांची भाषा चिथवणीखोर व दोन समाजात शत्रुत्व निर्माण करणारी आहे. मुनगंटीवार यांनी आदर्श आचारसंहिता आणि निवडणूक नियमांचे उल्लंघन केले असून सुधीर मुनगंटीवार यांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी निवडणुक आयोगाकडे केली आहे. राज्य निवडणुक अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीत अतुल लोंढे म्हणतात की, सुधीर मुनगंटीवार यांनी काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना उद्देशून प्रक्षोभक भाषा आणि अपमानजनक टिप्पणी केली. समाजात द्वेष आणि मतभेद निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. मुनगंटीवार यांचे भाषण केवळ आक्षेपार्हच नसून समाजात विषाचे बीज पेरणारे आहे. मुनगंटीवार यांनी भाषणात महिलांबद्दलही अपमानजनक विधाने करुन महिलांची बदनामी केली आहे.


MAHARASHTRA PRADESH CONGRESS COMMITTEE

To,
The Chief Electoral Officer,
State of Maharashtra

[illegible]

मुनगंटीवार यांनी चुकीची माहिती पसरवून लोकांची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न केला हा प्रकार लोकशाही प्रक्रियेला खीळ घालणारा व मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रकार आहे. त्यांची कृती केवळ आदर्श आचारसंहिता आणि निवडणूक नियमांचे उल्लंघन करणारी नसून लोकशाहीच्या नियमांची पायमल्ली करणारी आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केले असून चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून त्यांची उमेदवारी रद्द करावी, त्यांच्यावर आणि भाजपवर निवडणूका लढविण्यास बंदी घालावी, अशी मागणी अतुल लोंढे यांनी केली आहे.

# दिव्यांगाच्या एका मतासाठी यंत्रणा पोहोचली थेट दुर्गम गावात

## महाराष्ट्र – तेलंगणा सीमेवरील महाराजगुडा येथे गृहमतदानातून नोंदवले मत

आधुनिक केसरी न्यूज


प्रा. शाम हेडाऊ

चंद्रपूर : चंद्रपूरच्याच नव्हे तर राज्याच्या टोकावर असलेला जिवती तालुका.... त्यातच दुर्गम भाग आणि महाराष्ट्र – तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेले महाराजगुडा गाव.... गावातील एकूण मतदार 281... आणि यात एक दिव्यांग मतदार. होय, या एका दिव्यांग व्यक्तिच्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा गावात पोहचते आणि गृह मतदानाच्या माध्यमातून लोकशाहीसाठी अमूल्य असलेले मत नोंदविते. हीच लोकशाहीची खरी ताकद. सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच 85 वर्षांवरील मतदार आणि 40 टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. याच अनुषंगाने चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या मार्गदर्शनात 8 ते 14 एप्रिल या कालावधीत गृह मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. याचा शुभारंभ सोमवारी (दि.8) अतिदुर्गम असलेल्या जीवती तालुक्यात झाला. महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या महाराजगुडा येथील सुरेखा तुकाराम राठोड (वय 40) या एकमेव दिव्यांग असलेल्या महिलेने गृह मतदानाची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार प्रशासनाने




त्यांच्याकडून नमुना 12 – डी भरून घेतला होता. सुरेखा यांचे गृह मतदान घेण्यासाठी सोमवारी (दि. 8) जीवती तालुक्यातील टीम क्रमांक 10, महाराजगुडा येथे सुरेखा यांच्या घरी पोहचली. गृह मतदानाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर सुरेखा यांनी आपले अमुल्य मत नोंदविले. सुरेखा ह्या पूर्णपणे दिव्यांग असून त्या एका क्षणासाठीसुध्दा उभ्या राहू शकत नाही. त्यामुळे त्यांनी आपले मत घरातच स्थापन केलेल्या मतदान कक्षात बसूनच नोंदविले आणि मतपत्रिका लिफाफ्यामध्ये टाकून अधिका–यांकडे सुपूर्द केली. यासोबतच सदर टीमने राज्याच्या सीमेवरील नारपठार (विजयगुडा) येथील जमुनाबाई दुर्गे आत्राम (वय 90), संग्राम किसन कोरपल्लीवार (वय 89) आणि मुद्रीकाबाई संग्राम कोरपल्लीवार (85) या वयोवृध्द नागरिकांचेही गृह मतदानाद्वारे मत नोंदविले. या टीममध्ये मतदान अधिकारी नंदकिशोर उपासणी, नागेश उरकुडे, सुक्ष्म निरीक्षक (मायक्रो ऑब्जर्झव्हर) शिवशंकर उपरे, क्षेत्रीय अधिकारी संदीप लंगडे, विलास वानखेडे, पोलिस अंमलदार कौमुद मडावी आणि छायाचित्रकार प्रफुल गिरसावडे उपस्थित होते.


**मतदानाची गोपनीयता :** गृह मतदान करतांना मतदान प्रक्रियेची गोपनीयता पाळण्याच्या सूचना भारत निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानुसार फॉर्म 13 - ए (डिक्लरेशन), फॉर्म 13 - बी (कव्हर ए लिफाफा), फॉर्म 13 - सी (कव्हर बी लिफाफा) आणि फॉर्म 13 - डी (मतदान कसे करायचे याबाबत सुचना) आदी प्रक्रियेबाबत अधिकारी व कर्मचा–यांनी सुरवातीला मतदारांना माहिती दिली. यावेळी घरामध्ये स्थापन केलेल्या मतदान कक्षामध्ये सदर मतदारांनी आपले मत नोंदविले. यावेळी मतदान करतांना कोणताही दुसरा व्यक्ती त्यांच्याजवळपास नव्हता. मतपत्रिका घडी केल्यानंतर सदर मतपत्रिका छोट्या लिफाफामध्ये आणि नंतर मोठ्या लिफाफामध्ये टाकून मतपेटीत जमा करण्यात आली.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


शेवटी ब्रह्मगिरी महाराजांनी खजील होऊन श्री महाराजांचे पाय धरले. असाच प्रसंग श्री महाराज मंदिराबाहेर बसून कीर्तन ऐकतानाचा आहे. जेव्हा बुवांना महाराजांच्या थोरपणाची जाणीव झाली तेव्हा कीर्तनकार बुवांनी त्यांना मंदिरात येऊन बसायला सांगितले. तेव्हा महाराज म्हणाले,बुवा, तुम्ही प्रवचनात सांगता ना की ईश्वर सर्वत्र आहे. आत काय आणि बाहेर काय? मग बाहेर बसल्याने काय फरक पडतो ? असे अनेक प्रसंग श्री महाराजांच्या चरित्रात आहेत. येथे त्या सर्वांचा उल्लेख करणे शक्य नाही. श्री महाराजांचे चरित्र म्हणजे सागर आहे. त्यात डुबकी मारावी आणि हवे तेव्हढे मोती उचलून घ्यावेत. मनुष्य प्राण्यांवर जशी महाराजांची सत्ता चालत होती तशीच मुक्या प्राण्यांवरही . निसर्गातील पंचमहाभूतावरही . आपल्या भक्तांबद्दल त्यांच्या मनात अपार प्रेम आणि जिव्हाळा होता. प्रेमाने माणसे जोडली जातात तर भक्तीने परमेश्वर जोडला जातो अशी त्यांची शिकवण व त्यानुसार त्यांचे आचरण होते. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, बोले तैसा चाले , त्याची वंदावी पाऊले असे श्री महाराजांचे वर्तन होते.त्यांच्याबद्दल लिहावे तेवढे कमीच आहे. जगाच्या कल्याण संतांच्या विभूती, देह कष्टविती परोपकारे. श्री महाराजांच्या चरित्रातून त्यांनी दिलेला प्रेमाचा संदेश, कोणाचाही माणसाचाच काय प्राण्याचा सुद्धा द्वेष न करण्याचा उपदेश ,सचोटीने आणि नीतिने वागण्याचा केलेला उपदेश एवढे जरी लक्षात ठेवले तरी संतांच्या शिकवणुकीचे सार्थक झाले असे म्हणता येईल. संतांचिया गावी प्रेमाचा सुकाळ, नाही तळमळ दुःख लेश म्हणून संतांचिया गावा जावे.




## हितगुज



पुष्प ३५वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

### भक्तीने जीवनात आनंद

राव मल्हार नृपती। त्याच्या अंतरी नाही भक्ती। मग आम्ही बडोद्याप्रती। काय म्हणोनी चलावे॥" हे बडोद्याच्या राजाला कळलेच नाही. हट्टाने त्याने उमराव यशवंताला पुन्हा अक्कलकोटला श्री स्वामी समर्थांना घेण्यास पाठवले. यशवंत ही भक्तीहीन सरदार होता. त्याने अक्कलकोटला येऊन महाराजांची भेट घेऊन त्यांचेपुढे सोन्याच्या ताटांमध्ये वस्त्रे, अलंकार ठेवले. ते पाहताच

*"ती पाहुनी समर्थांला।*
*तेव्हा अनिवार क्रोध आला।*
*यशवंता पाहोनी डोळां। काय तेव्हा बोलले।*
*अरे बेडी आणोनी। सत्वर ठोका याचे चरणी।*
*ऐसे त्रिवार मोठ्यांनी। समर्थ क्रोधे बोलले॥"*

भगवंताने या सृष्टीला, करोडो ब्रह्मांडांना निर्माण केले आहे. या नश्वर संपत्तीचा तो भुकेला नाही. तो भक्ताच्या हृदयातील खर्या भक्तीचा भुकेला आहे. श्रीरामाने शबरीची उष्टी बोरे आनंदाने खाल्ली. श्रीकृष्णाने हस्तिनापूरच्या महालात भोजन न करता विदुराच्या घरी पावट्याची उसळ आवडीने खाल्ली. या ऐहिक सुखाला लाथ मारून ईश्वर भक्तीचे अनंत सुख मिळवणाऱ्या या सर्व विभूतींची अनेकानेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. त्यापासून बोध घेऊन भक्तीचे प्रदर्शन करण्यापेक्षा, 'क्षणं आत्मानुसंधान पापं दहती कोटिशः' असे सर्व विसरून ईश्वर चरणांशी तल्लीन, एकरूप होण्याचे परमसुख अनुभवण्यासाठी हा मानवजन्म सार्थकी लावावा. या जगरहाटीनुसार व्यवहार, उपजीविका करावी लागेल पण पाकातल्या माशीसारखे त्यातच गुंतून राहणे, विनाशक आहे. ही सत्यता सर्वांनी समजून घेतली तर कितीतरी भ्रष्टाचार, पापे, शोषण, अन्याय, छळ इत्यादी समाजविघातक गोष्टींना, प्रवृत्तींना आळा बसेल. भक्तीने जीवनात आनंद व समानता आणणे, फारसे कठीण नाही. म्हणूनच खर्या भक्तीची गरज सदैव मानव समाजाच्या हितासाठी आहे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४



## आनंदी पहाट


### अध्यात्म आपल्याला संवेदनक्षम करून जागरूक ठेवते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत. त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. अध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण निश्चितच सक्षम होऊ शकतो. सध्याची परिस्थिती, त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. अध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व- मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो.



आधुनिक केसरी

### विठ्ठला स्मरून | शुद्ध व्हावे ||

असावे निर्मळ | मन गंगेवानी ||
नसावी करणी | दुराचारी ||१||
असावा शेजार | संतसज्जनांचा ||
टाळावा दुष्टांचा | सहवास ||२||
करावा संवाद | आपुल्या मनाशी ||
टाळावा जनाशी | फुका वाद ||३||
नित्य घडो पुजा | सात्विक कर्माची ||
जाण स्वधर्माची | असु द्यावी ||४||
करावा परमार्थ | संसारी राहून ||
विठ्ठला स्मरून | शुद्ध व्हावे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अन्त अवस्था आप्त है,
जीवन मुक्ति समाधि ।
शब्द सच्चिदानन्द है, ध्यय ध्याता गुण
साधि ।।८१।।(स्वर्वेद पंचम मण्डल षष्ठ
अध्याय) ०५/०६/८१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विहंगम योगाच्या समाधी द्वारे जीवन्मुक्ति होते. योगाच्या याच अंतिम अवस्थेला आप्त अवस्था म्हणतात. ध्यान करता करता जेव्हा ध्येयाचे गुण ध्याता आत्म्यात येतात तेव्हा तो शब्द सच्चिदानंद स्वरूपाला प्राप्त करतो. यालाच समाधी म्हणतात.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## नामसाधन कसे करावे ?

आधुनिक केसरी



नामाचे साधन कसे करावे ? एखाद्या दगडावर पुष्कळ पाणी एकदम ओतले तर तो दगड नुसता भिजेल आणि पाणी निघून जाऊन कोरडा होईल. पण तेच पाणी थेंब थेंब असे एकाच ठिकाणी आणि अखंड पडत राहिले तर त्या दगडाला भोक पडेल, आणि काही दिवसांनी दगड फुटूनही जाईल; त्याप्रमाणे, केव्हातरी पुष्कळ साधन करण्यापेक्षा अगदी अल्प प्रमाणात का होईना पण नित्यनेमाने, ठराविक वेळी, आणि शक्य तर ठराविक स्थळी, जर नामाचे साधन केले तर ते जास्त परिणामकारक होते. जात्याला दोन पेठी असतात; त्यांतले एक स्थिर राहून दुसरे फिरत राहिले तर दळण दळले जाऊन पीठ बाहेर पडते; पण जर दोन्ही पेठी फिरत राहिली तर दळण दळले न जाता फुकट श्रम मात्र होतात. माणसाचे शरीर आणि मन, अशी दोन पेठी आहेत. त्यांतले मन हे स्थिर आहे आणि देह हे फिरणारे पेठे आहे. मन परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करावे, आणि देहाने प्रपंचाच्या गोष्टी कराव्यात. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो. प्रारब्धरूपी खुंटा देहरूपी पेठ्यात बसून तो त्याला फिरवतो, आणि मनरूपी पेठे स्थिर असते. देह प्रारब्धावर सोडावा, आणि मन भगवंताच्या स्मरणात स्थिर ठेवावे, याहून नामाचे साधन दुसरे काय ! हे साधन अमक्यालाच साधेल असे नाही, ते कोणालाही साधेल. गरिबाला गरिबीचे दुःख होते म्हणून साधत नाही, तर श्रीमंताला पैशाचा अभिमान आणि लोभ असतो म्हणून साधत नाही; विद्वानाला विद्येचा अभिमान होतो म्हणून साधत नाही, तर अडाण्याला काय करावे हे समजत नाही म्हणून साधत नाही. साशंक वृत्तीने कितीही साधन केले, कितीही नामस्मरण केले, तरी कधी समाधान होणार नाही. नीतिधर्माचे आचरण, शास्त्रशुद्ध वर्तन, शुद्ध अंतःकरण आणि भगवंताचे स्मरण इतक्या गोष्टी असतील तरच साधक शेवटपर्यंत पोहोचेल; आणि शेवटपर्यंत तो पोहोचला तरच फायदा. ' घरी पोहोचल्यावर पत्र लिहा ' असे म्हणतात, याचा अर्थ हाच आहे. प्रपंच करीत असताना वाईट विचार मनात येतात, त्याचप्रमाणे परमार्थ करीत असतानाही वाईट विचार आले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. ज्यावेळी वाईट विचार मनात येतील त्यावेळी भगवंताचे नाम घेतले तर त्या विचारांची मजल पुढे जाणार नाही. दृढ विश्वासाने नाम चालू ठेवावे. जिथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे तिथेच समाधानाची प्राप्ती होते. ' भगवंता, मी तुझा आहे ' असे रात्रंदिवस म्हणत गेल्याने भगवंत प्रकट होत जाईल; आणि भगवंत जितका प्रकट होत जाईल तितके ' मी ' पणाचे दडपण आपोआप कमी होत जाईल.

**२४. प्रारब्धाची व ग्रहांची गती देहापर्यंतच आहे. मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही.**

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

माघ वद्य नवमी म्हणजे दासनवमी समर्थांच्या पुण्यस्मरणाचा दिवस. मित्रांनो मला काही विचारणा झाली की दासनवमी च्या निमित्ताने मला भावलेले समर्थ ही सात दिवसांची लेखमाला लिहा. लिहिली खरी !!पण सांगू का!!! समर्थांचे विचार हे गेली तीन वर्षे सातत्याने लिहित आहे तर आता नववा दशक चालू आहे. हे अवघड काम माझ्या आयुष्यात पूर्ण व्हावे हीच समर्थ चरणीं प्रार्थना तर समर्थांचे विचार सात दिवसांत थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न म्हणजे लहान तोंडी मोठा घास आहे. त्यात काही चूक झाली तर समर्थ माफ करतील अशी आशा करून सात दिवस लेखमाला लिहिली व वाचकांची मागणी पूर्ण केली. आता आपण नित्य नव्या अभ्यासाकडे वळूया. गुणरूपनिरसन या समाजामध्ये समर्थांनी संपूर्ण विश्व मनाचे वर्णन केले आहे. जालना जिल्ह्यातील जांब गावचा एक खोडकर व्रात्य मुलगा वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी आपल्या आईला म्हणतो. चिंता करितो मी विश्वाचि संत साहित्याचा अभ्यास करत असताना एक गोष्ट लक्षात आल्यावाचून राहत नाही. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज आणि रामदासस्वामी हे सर्व जण संत महात्मे होऊन गेले संतांनी स्वतः ला काही मागितले नाही तर त्यांनी विश्व मनाचा विचार केला. त्यात पुढे बाल शिवबा वर पण जिजाऊने देशप्रेमाचेच धडे शिकवले अशी ही थोर मंडळी. सबंध दृष्य विश्वाला व्यापून रहाणारी व धारण करणारी एक मोठी जाणीव आहे तिला हिरण्यगर्भ किंवा ओंकार म्हणतात. ऋग्वेदात एक मंत्र आहे "हिरण्यगर्भःसमवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्
अर्थ-- विश्व निर्माण होण्यापूर्वी हिरण्यगर्भ एकटाचं होता.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १० एप्रिल २०२४
adhunikkesari.com



# तुम्ही फक्त सोबत रहा बाकी मी सांभाळतो..!

## अशोक चव्हाण यांचे प्रतिपादन : पाळजला प्रचाराचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** विधानसभा मतदारसंघात विकासाचा चढता आलेख बघीतला तर सारेच चकीत होतात. भविष्यात आणखी विकासाचा कळस गाठायचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकाभिमुख विकासाला झुकतमाप दिल्याने आपला देश आजघडीला आघाडीवर आहे. जनतेनेसुध्दा त्यांना पंसती दिली म्हणून मी तूमच्या सोबत आलो आहे. यावेळी तुम्ही फक्त अशीच साथ द्या बाकी मी सांभाळतो असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी सोमवारी (ता.आठ) केले आहे.

भाजपाचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचाराचा शुभारंभ पाळज येथील संकटमोचक गणपतीचे दर्शन घेऊन करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.व्यासपीठिवर माजी आमदार अमर राजूरकर,सौ.मंगाराणी अंबुलगेकर,राजा खंडेराव देशमुख,नामदेव आयलवाड, जगदीश पाटील भोसीकर, विनोद पाटील चिंचाळकर,भगवान दंडवे, दिलीप सोनटक्के,गणेश कापसे बटाळकर,किशोर पाटील लगळूदकर,गणपत पिट्टेवाड, विशाल माने, दिवाकर रेड्डी सूरकूंटवाड,नरसारेड्डी गोपूलवाड, रामचंद्र मूसळे यांची उपस्थिती होती.श्री.चव्हाण म्हणाले की,पाळज येथील जागृत गणेश मंदिर हे एक पवित्र देवस्थान आहे. त्यामूळे भाजपाचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचाराचा शुभारंभ गणरायाच्या साक्षीने करण्यात आला.त्यांचा आशिर्वाद आणि मतदाराचा पाठिंबा सोबत असला की नक्कीच यश मिळते हि गॅरंटी कूणीच नाकारू शकत नाही. येथील तिर्थक्षेत्राच्या विकासाठी मी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला असून भविष्यात हि निधीची कमतरता भासू देणार नाही.तालूक्यातील शेती सिंचन,पाणीपुरवठा,रस्ते आणि तलावाची कामे लवकरच मार्गी लागतील. कै.शंकरराव चव्हाण आणि मला येथील जनतेनी भरभरून प्रेम दिले आहे. आता मी भाजपात आलो तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी याचे हात बळकट करून त्यांना पुन्हा पंतप्रधानपदि विराजमान करण्यासाठी

साथ द्यावी.मी त्यांच्या सहकार्याने खासदार झालो. माझ्या सोबत आणखी एक खासदार तुमच्या पाठिंब्याने संसदेत पाठवायचा आहे.तुम्ही जर चुकीचा निर्णय घेतला तर पुढिल पाच वर्ष वाया जाणार आहेत.माझी तूम्हाला अन् तुमची मला गॅरंटी आहे त्यामुळे भाजपाच विजय निश्चित आहे याची मला खात्री आहे असे सांगितले. ऊपसंरपच सुभाष चटलावार यांनी प्रास्ताविक केले.तालूक्यातील देवठाणा, रेणापूर येथे जाहीर सभा घेण्यात आली.

मराठा बांधवांकडून घोषणाबाजी

खासदार अशोक चव्हाण रेणापूर येथील सभा आटोपून भोकर कडे येत असताना बटाळा येथील सकल मराठा समाजबांधवांनी सोमवारी रात्री १० वाजताच्या सुमारास एक मराठा लाख मराठा अशा घोषणा दिल्या. पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

## भीम जयंतीनिमित्त भव्य बाईक रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने धुळे शहरात दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती स्मारक बस स्टॅन्ड जवळ भव्य फलक अनावरण करण्यात येणार आहे. तसेच भीमजोष प्रस्तुत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनावर पटनाट्य सादरीकरण करण्यात येणार आहे. तसेच या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आल आहे.

तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी धुळे शहरातील विविध मार्गातून भव्य बाईक रॅली काढण्यात येणार आहे. सदर या बाईक रॅलीत महिला युवती, युवक पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून आपण देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाईक रॅलीची शोभा वाढवावी. असे आवाहन देखील कार्यक्रमाचे आयोजक शंकर अण्णा खरात, नयनाताई दामोदर, शोभाताई चव्हाण, पुनम ताई शिरसाठ,तसेच नागसेन बागुल, विशाल पगारे, पुक्क्या साळवे,सिद्धार्थ वाघ, गणेश जगदेव, नागिंद मोरे, सरोजताई कदम, कल्पनाताई खरात, शोभाताई बैसाणे, मायाताई पानपाटील, सरलाताई निकम यांनी केले आहे.

## राज ठाकरे म्हणजे वाघ माणूस : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज ठाकरे हे वाघ माणूस आहेत. मात्र त्यांना कोल्हा करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून होत आहे. राज ठाकरे हे दिल्लीच्या सत्तेपुढे कधीही झुकणार नाही, असे ते वारंवार सांगत होते. मात्र, दिल्लीची वारी त्यांना करावी लागली. यात कुठेतरी त्यांना अडचणीत आणण्याचे, त्यांना पिंजऱ्यात अडकवण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होतंय का, अशी शंका सध्या महाराष्ट्रातील जनतेच्या मनात असल्याचे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र डागले आहेत.

आज होणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे यांची भूमिका ही सत्ताधारा विरोधात नसेलच असा कयास सध्या बांधण्यात येतोय. मात्र, राज ठाकरे दिल्लीच्या तक्तापुढे झुकणार नाही, ही प्रत्येक मराठी माणसाची अपेक्षा आहे. म्हणूनच आज राज ठाकरे जे काही बोलतील ते सत्ताधाऱ्यांच्या विरुद्ध असेल आणि दिल्लीश्वरापुढे झुकणारे नसेल, असा विश्वासही विजय वडेट्टीवार यांनी बोलताना व्यक्त केलाय.

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे विचार आणि भाषा किती असांस्कृतिक आहे, हे काल महाराष्ट्रातील जनतेने बघितले आहे. काल चंद्रपुर येथे पंतप्रधानांच्या उपस्थितीत पार पडलेल्या प्रचारसभेत महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासण्याचे काम त्याठिकाणी केल्या गेलंय. अशा विचारांना महाराष्ट्रातील जनता योग्य तो धडा शिकवेल, अशी टीकाही विजय वडट्टीवार यांनी सुधीर मुनगंटीवारांवर केलीय. अर्धवट माहितीचा आधार घेऊन अशा पद्धतीने किळसवाणे वक्तव्य करणं हे कुठल्याही महाराष्ट्रातील माणसाला न पटणारे आहे. तसेच जनता देखील अशा खालच्या स्तरावरील विचारांना कधीही खपवून घेणार नाही. अशा प्रवृत्तीला आगामी काळात जनता योग्य तो धडा शिकवेल, असा विश्वासही विजय वडट्टीवार यांनी बोलताना व्यक्त केलाय.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवळपास 33 मिनिटं भाषण केले. मात्र, त्यात सगळे विषय हे केंद्राचे होते. त्यांच्या भाषणात चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी काय देणार किंवा चंद्रपूरसाठी तुम्ही काय आणणार, यावर ते काहीही बोलले नाही. भाजपचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी आणीबाणी वर बोलताना अगदी खालच्या पातळीवर जाऊन गलिच्छ वक्तव्य केले आहे. त्यांच्या सारखा मुरब्बी आणि मातब्बर राजकारणी अशा पद्धतीने वक्तव्य करेल याची आम्हाला अजिबात कल्पना नव्हती. देशी आणि देश याच्या बाबतीत मुनगंटीवार जे बोलले त्यावर आम्ही जास्त बोलणार नाही. गेल्या निवडणुकीत पण हा विषय आला होता. पण विजय कोणाचा झाला आणि पराजय कोणाचा झाला, हे सगळ्यांना माहीत आहे. त्यामुळे त्यावर काहीही न बोलता आगामी निवडणुकीत कौल कोणाच्या बाजूने असेल हे स्पष्ट होईल, असा विश्वासही काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांनी बोलताना व्यक्त केलाय.

## क्रिप्टो करन्सीच्या नावावर युवकाने गमावले २३ लाख

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** एका युवकाला व्हॉट्सॲपवर आलेल्या लिंकमधून क्रिप्टो करन्सीत गुंतवणुकीची माहिती मिळाली. त्याने कोणतीही शहानिशा न करता गुंतवणूक केली. काही दिवस दर दिवसाला ५ ते १० हजार रुपयांची कमाई दिसत असल्यामुळे युवकाने तब्बल २३ लाख रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर १५ दिवसांतच सर्व रक्कम सायबर गुन्हेगाराने आपल्या खात्यात वळते करून फसवणूक केली. सुरुवातीला गुंतवणुकीच्या रकमेवर चांगला परतावा देऊन सायबर गुन्हेगार गुंतवणुकदारांना जाळ्यात ओढतात. नागपुरातील सिम्बॉयसीस कॉलेज येथे राहणारे सौरभकुमार शर्मा (बैसाखी-पश्चिम बंगाल) यांना एक लिंक मिळाली. त्यामध्ये क्रिप्टो करन्सीत गुंतवणूक केल्यास मोठा परतावा मिळण्याचे आमिष होते. सौरभकुमार यांनी नोव्हेंबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीत १ लाख रुपये गुंतवले. त्यांना १० दिवसांत दोन लाख रुपयांची कमाई झाली. त्यामुळे सौरभकुमारने खात्यातील २३ लाखांची रक्कम गुंतवली. काही दिवस १० हजार रुपये कमाई व्हायला लागली.सर्व सुरळित असतानाच एक दिवस अचानक सौरभकुमार यांचे खाते बंद झाले आणि गुंतवलेली रक्कम हडपल्या गेली. प्रकार लक्षात येताच त्यांनी वाठोडा पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून गुन्ह्याची एक एक कळी उलगडने सुरु केले आहे. या प्रकरणी वाठोडा पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली होती.




# चिंताजनक अहवाल

आधुनिक केसरी

देशातील कर्करुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कर्करोग कमी वयात जडण्याचे प्रमाणही वाढू लागले आहे. पुरुषांमध्ये फुप्फुस, मुख, प्रोस्टेट कर्करोग आणि महिलांमध्ये स्तन, गर्भाशय, अंडाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. अपोलो हॉस्पिटलने जाहीर केलेल्या राष्ट्रीय आरोग्य अहवालातून हे वास्तव समोर आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अहवालानुसार, जागतिक पातळीवरील कर्करुग्णांच्या तुलनेत भारतातील कर्करुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. देशात कर्करोग होण्याचे सरासरी वय कमी झाले आहे. स्तनाचा कर्करोग होण्याचे सरासरी वय भारतात ५२ वर्षे असून, अमेरिका आणि युरोपमध्ये ६३ वर्षे आहे. फुप्फुसाचा कर्करोग होण्याचे सरासरी वय भारतात ५९ वर्षे असून, पाश्चिमात्य देशांमध्ये ते ७० वर्षे आहे. मोठ्या आतड्याचा कर्करोग होण्याचे सरासरी वय भारतात ५० वर्षे आहे. कर्करोगाचे प्रमाण वाढत असताना त्याची तपासणी करण्याचे प्रमाण कमी आहे. स्तनाच्या कर्करोगाच्या तपासणीचे प्रमाण भारतात १.९ टक्के असून, अमेरिकेत ते ८२ टक्के, ब्रिटनमध्ये ७० टक्के आणि चीनमध्ये २३ टक्के आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची तपासणी करण्याचे प्रमाण भारतात ०.९ टक्के असून, अमेरिकेत ७३ टक्के, ब्रिटनमध्ये ७० टक्के आणि चीनमध्ये ४३ टक्के आहे, असे अहवालात म्हटले आहे. भारतीयांमध्ये लठ्ठपणा वाढत असल्याचेही अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. 'अपोलो'मध्ये तपासणी झालेल्या चारपैकी तिघा जणांमध्ये लठ्ठपणा आढळून आला आहे. लठ्ठपणाचे प्रमाण २०१६ मध्ये नऊ टक्के होते. ते २०२३ मध्ये २० टक्क्यांवर पोहोचले आहे. देशातील तीनपैकी दोन जण उच्च रक्तदाबाच्या विकाराकडे जात आहेत. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांचे प्रमाण २०१६ मध्ये नऊ टक्के होते, ते २०२३ मध्ये १३ टक्क्यांवर पोहोचले. देशात तीनपैकी एका व्यक्तीला पूर्वमधुमेह असून, दहापैकी एकाला अनियंत्रित मधुमेह आहे. याचबरोबर दहापैकी एकजण नैराश्यग्रस्त आहे. नैराश्याचे प्रमाण १८ ते ३० या वयोगटात आणि ६५ वर्षांवरील ज्येष्ठांमध्ये सर्वाधिक आहे, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# क्रांतिसूर्याचा प्रभाव : डॉ. हेडगेवार



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592


आधुनिक केसरी

**डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनावर क्रांतिसूर्य वि.दा. सावरकर यांचा विलक्षण प्रभाव होता. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हे प्रमेय त्यांनी सावरकरांच्या विचारातून घेतले. त्यांनी सावकरांचा सुधारणा विचार कृतीमध्ये आणण्याचा प्रयत्न केला. डॉ. हेडगेवार यांचे जीवन म्हणजे धगधगते होम कुंड होते. कलकत्त्यामध्ये असताना अनुशीलन समिती या भूमिगत संघटनेचे कार्य करून त्यांनी स्वातंत्र्यासाठी क्रांतिकार्याच्या संघटनेचा मार्ग स्विकारला. याच काळात त्यांच्या मनात असलेल्या हिंदुत्वाच्या संघटनेच्या उभारणीची बैठक तयार होत होती. त्यातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एक संकल्पना त्यांनी आपल्या मनात विकसित करण्यास सुरुवात केली होती.**

याच काळात, पूजनीय डॉक्टरांनी विनायक दामोदर सावरकर यांच्या व्यक्तित्व, कार्य व कर्तृत्वाचा ठसा स्विकारला. सावरकरांचे हिंदुत्व हे प्रमेय, जे त्यांनी रत्नागिरीच्या कारागृहात असताना विकसित केले होते, ते वाचल्यानंतर तर त्यांना देशाच्या प्रगतीचा एक नवा मार्ग लक्षात आला. आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी हिंदुत्वाची उपासना करणे आवश्यक आहे. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे आणि हो हिंदू राष्ट्रच आहे असा विचार त्यांच्या मनात डोकावू लागला. या सिद्धांतातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उभारण्याचा नवा मार्ग त्यांनी अनुसरला व तो सिद्धीस नेला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या हिंदुत्व विचारातून त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली. हिंदुत्व हे प्रमेय वाचले आणि त्यांना जे हवे होते ते गवसले. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे आणि हे हिंदू राष्ट्र आहे हा विचार ते आग्रहाने मांडू लागले. सावरकरांच्या हिंदुत्वाला त्यांनी गांधींच्या सेवेची जोड दिली आणि त्यातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वैचारिक बैठक उभी राहिली.

**हिंदुत्वाचे नवे पर्व**ः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना म्हणजे हिंदुत्व विचारांचे नवे तेजस्वी पर्व ठरले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी अत्यंत दूरदृष्टीने हिंदू संघटनेला नवचैतन्य प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक संघटना निर्माण केली. ही संघटना म्हणजे एक नवा परिवर्तनाचा मार्गच होता. ही केवळ संघटनाच नव्हे, तर एक लोक चळवळ उभी केली. ही संघटना म्हणजे नवे क्रांतीकारक तत्त्वज्ञानच होते. ही संघटना म्हणजे समाजसेवेचा एक नवा आदर्शच होता. १९२० या दशकात डॉ. हेडगेवारांनी राष्ट्रीय महासभेच्या म्हणजे कॉँग्रेसच्या कार्यात प्रत्यक्ष भाग घेण्यास सुरुवात केली. ते गांधी यांचे निष्ठावान कार्यकर्ते बनले. वर्धा येथील आश्रमात जाऊन ते गांधीजींशी चर्चा करू लागले. विचारविनिमय करू लागले. त्यांनी नागपूर येथे झालेल्या कॉँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव मांडला होता. तो ठराव त्यावेळी संमत झाला नाही. पण पुढील वर्षी तो ठराव नेहरू यांनी लाहोर अधिवेशनात मांडला. त्याची खरी बैठक हेडगेवारांनीच घातली होती हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. अशाप्रकारे डॉ. हेडगेवार हे राष्ट्रीय महासभेत एक अग्रेसर कार्यकर्ता म्हणून पुढे आले. ते गांधीजींचे अनुयायी बनले. त्यांनी हिंदुस्थान सेवा दल, कॉँग्रेस सेवा दल या स्वयंसेवक संघटनांमध्येही कार्य केले. त्या संघटनांची रचना, कार्यपद्धती याचा अभ्यास केला व त्यातील उणिवा कोणत्या आहेत, त्या कशा दूर करता येतील यावरही त्यांनी सखोल चिंतन केले आणि त्यातूनच नागपूरमध्ये १९२५ साली मोहिते मळ्यात एका पडक्या वाड्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. इथूनच भारताचे भाग्य बदलणारे एक नवे संघटन जन्माला आले. डॉक्टरांच्या जीवनकार्यावर, व्यक्तिमत्वावर विलक्षण छाप होती महात्मा गांधींच्या सेवा विचारांची, हिंदुत्व जीवनशैलीची. परंतु कॉँग्रेसची कार्यपद्धती आणि ध्येयधोरणे यामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला. आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आपण वेगळा मार्ग अनुसरावा असे त्यांनी ठरविले आणि त्यांनी बाबाराव सावरकर, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, बी.एस. मुंजे यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या नावाचे स्वतंत्र संघटन स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि भारतीय राष्ट्रवादाचा खरा आधार सांस्कृतिक राष्ट्रवाद हाच आहे हे त्यांनी ओळखले. महर्षी अरविंद घोष यांच्या लेखनाचीही त्यांनी पारायणे केली होती. अरविंदांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद म्हणजे महामानवाची मुक्तीगाथा. त्यातूनच त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेसाठी वैचारिक बैठक प्राप्त झाली. रत्नागिरीच्या बंदिवासात असताना सावरकरांनी लिहिलेले हिंदुत्व हे प्रमेय त्यांना नवी दिशा देणारे ठरले. भारताचे भाग्य बदलण्याचे





सामर्थ्य केवळ हिंदुत्व विचारात आहे हे त्यांनी लक्षात घेतले आणि त्या दिशेनेच आपल्या संघटनेची वैचारिक बैठक निर्माण केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेनंतर देशाच्या क्रियाकल्पात त्यांनी संपूर्ण परिवर्तन घडवून आणले. त्यांनी हे जाणले की, ब्रिटीशांना भारतातून हुसकावून लावणे हे तर आवश्यक आहे पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे हा देश चालविण्यासाठी समर्थ व बलशाली अशी तरुणांची संघटना हवी आहे. चारित्र्यसंपन्न, ध्येयवादी आणि स्वाभिमानी असे तरुण संघाच्या मुशीतून तयार होतील. या भावनेने त्यांनी संघाची एक भक्कम बैठक तयार केली. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या प्रशिक्षण वर्गाची रचना केली आणि त्यातून कार्यकर्ता निर्माण केला. पूजनीय डॉक्टरांचा दृष्टिकोन होता की, कार्यकर्त्याची जडणघडण महत्त्वाची आहे, त्याचे व्यक्तिमत्व घडविणे महत्त्वाचे आहे. आम्हाला असा कार्यकर्ता हवा आहे की, जो भारतामध्ये खंबीरपणे उभा राहील आणि जगामध्येसुद्धा आदराने व सन्मानाने त्याच्याकडे पाहिले जाईल, असा तरुण आम्हाला उभा करावयाचा आहे. हे त्यांचे स्वप्न अटलबिहारी वाजपेयी व नरेंद्रभाई मोदी यांच्या रूपाने साकार झाले. त्यांच्या या क्रांतीकारक संघटनेतूनच भारताचे भवितव्य बदलले आहे.

**मौलिक योगदान**ःडॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे मौलिक योगदान कशात असेल तर जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था स्थापन करण्यात आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांनी जेव्हा मोहिते मळ्यामध्ये एका पडक्या वाड्यात स्थापन केला, तेव्हा या संघटनेच्या स्थापनेप्रसंगी १५-२० स्वयंसेवक उपस्थित होते. या संघटनेचे एका वटवृक्षात रुपांतर होईल असे त्यांना कदाचित वाटलेही नसेल. परंतु त्यांचा असीम ध्येयवाद, प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि प्रबल आत्मविश्वास या जोरावर त्यांनी हे संघटन रुजविले, जोपासले आणि वाढविले. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, त्यामागे त्यांचा स्वच्छ, स्पष्ट आणि विलक्षण ध्येयवाद होता. त्यांच्या कार्याचे योगदान स्पष्ट करताना तीन तत्त्वे प्रामुख्याने सांगावी लागतील. पहिले तत्त्व म्हणजे, त्यांच्या संघटनेतील चैतन्यदायी तत्त्वज्ञान. ते असे म्हणत असत की, या विराट समाजपुरुषातील चैतन्य निद्रीस्त झाले आहे. ते जागृत केल्याशिवाय हे राष्ट्र पुन्हा जागे होणार नाही आणि पुन्हा पुरुषार्थ प्रकट करणार नाही. तेव्हा हिंदू समाजातील हे विलक्षण चैतन्य जागृत करण्याचे श्रेय त्यांच्याचकडे जाते. दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे, हे सांगून त्यांनी संघटनेचे कार्य हिंदुत्वाच्या प्राणतत्त्वावर प्रस्थापित केले. तिसरे तत्त्व म्हणजे त्यांनी गांधीजींचा सेवाविचार आणि सावरकरांचा सिंधुत्व विचार यातला सुरेख संगम आपल्या संघटनेत प्रकट केला. त्यामुळे या संघटनेचे रुपांतर विशाल वटवृक्षात झाले आहे. देशभक्ती, समाजसेवेची तीव्र जाणीव आणि प्रत्येक स्वयंसेवकाच्या अणुरेणूत देशभक्तीचा भाव, समाजसेवेचा भाव जागृत करण्याचे त्यांचे सामर्थ्य खरोखरच नवी दिशा देणारे ठरले आहे.

**असे जोपासले रोप**ः त्यांनी पाहिले की, संघटनेचा नुकताच जन्म झाला आहे, अशा वेळी ब्रिटीशांच्या विरुद्ध मोठी आगपाखड करणे उपयोगाचे नाही. इंग्रज आपल्या संघटनेचे अंकुर केव्हा उखडून टाकतील हे सांगता येणार नाही. व्यक्तिशः मी गांधीजींच्याबरोबर आहे. त्यांनी तीन वेळा सत्याग्रहात भाग घेतला. जंगल सत्याग्रहात भाग घेतला. तीन वेळा कारावास पत्करला. परंतु प्रत्येक कार्यकर्त्याला ते सांगत असत, 'मिठाच्या सत्याग्रहात तुम्हाला भाग घ्यायचा आहे. मोकळीक आहे, तुम्ही भाग घेऊ शकता.' त्यांनी स्वतःही भाग घेतला. परंतु प्रत्येक कार्यकर्त्याने यात उडी मारावी, संघटनेने त्यात झोकून द्यावे अशा स्वरुपाची भूमिका त्यांनी घेतली नाही. कारण तसे केले असते, तर जन्माआधीच संघटनेवर बंदी आली असती आणि संघटनकार्य कुठेतरी ठप्प झाले असते. हे लक्षात घेऊन त्यांनी अशी वेगळी व्यूहरचना केली. ते स्वतः राष्ट्रीय महासभेबरोबर स्वातंत्र्याच्या आंदोलनात होते. संघटनेतील प्रत्येक स्वयंसेवकाला त्यांनी स्वातंत्र्य दिले होते. प्रत्यक्ष इंग्रजांविरुद्ध संघटनेने तिच्या जन्माच्या काळात लढणे फारसे प्रस्तुत होणार नाही ही त्यांची भूमिका होती. तथापि, स्वातंत्र्यलढ्यात त्यांचा वैयक्तिक सहभाग एवढा मोठा होता की, कारावासानंतर ते जेव्हा मुक्त झाले, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये मोतीलाल नेहरु यांचाही समावेश होता. यावरून कॉँग्रेसमध्ये हेडगेवार यांच्या कामाची किती उंची होती हे लक्षात येईल. डॉ. हेडगेवारांनी नागपूर अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव मांडला. तो त्यावेळी संमत झाला नाही. परंतु पुढे लाहोर अधिवेशनात हाच ठराव २६ जानेवारी १९३० रोजी नेहरूंनी मांडला व तो संमत झाला. परंतु हेडगेवारांनी यावेळी भगवा ध्वज फडकवून हा संपूर्ण स्वराज्याचा ठराव कृतीमध्ये आणला आणि संघ शाखावर सुद्धा तो साजरा केला. हे हेडगेवारांच्या मनाचे औदार्य लक्षात घेण्यासारखे आहे. चं.प. भिशीकर यांनी लिहिलेल्या चरित्रात हेडगेवारांच्या भूमिकेचे विश्लेषण अत्यंत विलक्षणपणे केले आहे. ते म्हणतात, पूजनीय डॉक्टर आपल्या भाषणातून हिंदू संघटनेबद्दल बोलत असत. इंग्रजांचाही विरोध करत. पण ते स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी व्यक्तिशः जसे आग्रही व सक्रिय होते, तसे संघटनेने या लढ्यात स्वतः उडी घेणे हे फारसे हितावह नाही, हे त्यांनी ओळखले होते. चं.प. भिशीकर यांनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे आहे. त्यांनी यथार्थ वस्तुनिष्ठतेवर कसा भर दिला हे यावरून स्पष्ट होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संघटना मजबूत करण्यासाठी पूजनीय डॉक्टरांनी देशभर दौरे केले. रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग या न्यायाने सबंध देशामध्ये संघटनेचे जाळे तयार केले. आणि स्वातंत्र्यापूर्वीच अखंड भारतामध्ये संघाचे कार्य एवढ्या गतीने चालू होते की, पूर्व- पश्चिम, उत्तर-दक्षिण चारही दिशांनी संघाने डॉ. हेडगेवारांच्या जीवनकाळातच आपल्या कार्याचा विस्तार केला होता.

# नवे वर्ष नवी आव्हाने



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**नवे वर्ष नेहमीच काही तरी नवे घेऊन येते. हा निसर्ग नियम आहे. भविष्य हे वर्तमाना पेक्षा वेगळे असते. वर्तमानात आपण अनुभवीत असलेले बदल खरेच आश्चर्यकारक असेच आहेत. आपल्या देशापुरते बोलायचे झाल्यास सामाजिक, राजकीय वातावरण पार गढुळले आहे. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे अधिक काळ लोटल्या नंतरही या स्वातंत्र्याची किंमत आपल्याला कळली नाही असे खेदाने म्हणावे लागते. उत्तम संविधान, सकस लोकशाही, सुदृढ न्याय व्यवस्था सारे काही उत्तम असूनही, आपण स्वतःला प्रगत म्हणवून घेत असलो तरी, देश आनंदी नाही. आनंदी देशाच्या क्रमवारीत आपण रसा तळाला आहोत! गरीब श्रीमंत ही दरी कमी होण्या ऐवजी वाढतेच आहे. बेरोजगारी प्रचंड प्रमाणात आहे. उत्तम शिक्षण व्यवस्था फक्त कागदावर..**

सुरुवात आपण आपल्या पासून करायला हवी. आपले संकुचित, स्वार्थी विचार आपण प्रत्येकाने बदलले पाहिजेत. आपले विचार बदलले की आपले आयुष्य बदलेल. आपली प्रगती, आपले सुख, आपला आनंद हे आपण निवडून दिलेल्या लोकशाही नेत्याच्या हातात नाही. सगळे आपल्याच हातात आहे. म्हणूनच सुरुवात स्मृतः पासून करायची आहे. त्यासाठी प्रत्येकाने पाहिले पाऊल पुढे टाकणे हे खरे आव्हान आहे. आपण फक्त आपल्या पिढीचा विचार करून उपयोगाचे नाही. आपण गेल्यावर आपण आपल्या नातवा साठी मागे काय, कोणते जग सोडून जाणार आहोत? जे खाच खळगे आपण भोगले, जे दूषित वातावरण आपण सहन केले, ज्या चिखलात आपण रुतलो, ते तसेच त्यांच्या नशिबात यायला नको असे आपल्या पैकी प्रत्येकाला निश्चित वाटत असणार. मग त्यासाठी आपण शहाणे व्हायला हवे वेळीच. प्रत्येक मागे



जाणारा क्षण लाख मोलाचा असतो हे आपण विसरता कामा नये. त्यामुळे वेळीच सावध होणे गरजेचे. या शुभ कर्यासाठी गुढी पाडव्या सारखा दुसरा मुहूर्त नाही.

हे आव्हान पूर्ण करण्याची ताकद कुणाकडे आहे? अर्थातच प्रशासनाकडे! प्रशासन म्हणजे सरकार नव्हे. सरकार निर्णय घेते. पण त्याची अम्मल बजावणी प्रशासन करते. प्रशासनात दुसरे तिसरे कुणी नाही तर तुम्ही आम्ही, आपल्या पैकीच कुणी तरी असते. ही प्रशासनातील आपल्या पैकी असलेली मंडळी प्रामाणिक, स्वच्छ, कामसू, असली तर वर निर्देशित अर्ध्या अधिक समस्या सहज सुटतील. आपण सगळे समस्येचे धनी आहोत. आपल्याला सोलुषन चा भाग व्हायचे नाही. कारण आपण आळशी आहोत. आपणच समस्या सोडविण्याच्या प्रक्रियेचा भाग झालोत तर समस्या आपोआप, सहज सुटतील. त्यासाठी सुध्धा गुढी पाडव्या सारखा दुसरा मुहूर्त नाही!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पक्षांच्या जलतृप्तीसाठी सरसावले चिमुकले..!

## भर जहागीर जि.प. केंद्रीय शाळेचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील भर जहागीर येथील जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी पक्षांसाठी जलपात्रे तयार करून एक प्रकारची पक्षांची तृष्णा तृप्ती केली आहे. एप्रिल महिन्याची सुरुवात झाली असून सूर्य कडक तापतोय या असह्य होणाऱ्या उन्हाळ्या मध्ये प्रत्येकांच्या जिवाची लाही -लाही होत आसल्याने पाण्याची नितांत गरज असते माणुस कुठहे पाणी पिऊ शकतो, परंतु पशु-पुक्षांचे काय याचा विचार करून भर जहागीर जिल्हा परिषद केंद्रीय शाळेच्या उपक्रमशिल शिक्षीका उषा हाडे यांनी शाळेतील कर्मचा-यांच्या सहकार्याने शालेय मुलांचा सहभाग घेत विविध ठिकाणी जलपात्रांची व्यवस्था करून पशू पक्षांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपण समाजाचे कुठे तरी देणं लागतो आणि त्या अनुषंगाने त्यांचा हा विद्यार्थांना सहभागी करून केलेल्या उपक्रमाची सर्वच स्तरातून प्रशंसा होत असून विद्यार्थ्यांना देखील भावी जीवनामध्ये आपण कशा प्रकारे जीवन जगले पाहिजेत याचे



धडे यामधून रुजवले जात आहेत.

प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबुत करत पुढील आयुष्याला आकार देत असतेच.कारण शासणाने सुध्दा हल्ली कृतीशिल शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे. तर टाकाऊ वस्तु पासुन टिकाऊ वस्तुंची निर्मिती करण्याचे धडे विद्यार्थ्यांना बाल वयात मिळाल्यास त्याचा फायदा जीवनात निश्चित होईल.याचे अनुकरण करीत तालुक्यातील भर जहागीर

> शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानार्जनासह, काही सामाजीक, कार्याची सुद्धा आवश्यकता असते. त्याच अनुषगाने विद्यार्थांना सहभागी करीत पक्षांसाठी जलपात्रांची व्यवस्था करण्यात आलेली आहे .या मधुन विद्यार्थ्यांना पक्षी निरीक्षण करणे अगदी सोपे होते हे विशेष . जहागीर जि .प .केंद्रीय शाळेच्या उपक्रमशिल शिक्षीका उषा हाडे यांनी शाळेतील मुलांचा सहभाग घेत विविध ठिकाणी जलपात्रांची व्यवस्था केली आहे .
> **उषा हाडे उपक्रमशील शिक्षिका जि . प . प्राथ शाळा भर**

जि.प.केंद्रीय शाळेतील कृतीशिल शिक्षीका उषा हाडे यांच्या माध्यमातून उन्हाळ्यातील पारा 40 अंश सेल्सीयस च्याही वर गेल्याने अनेकदा पशु-पक्षांचा पाण्या अभावी मृत्यु होतो.हे चित्र अतिशय विदारक असून मन हेलावणारे आहे. कुठल्याही पक्षाचा मृत्यु होणार नाही यासाठी शाळेच्या आवारात तसेच विद्यार्थ्यांच्या घराच्या अंगणामध्ये,शेतातील झाडांना ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी जलपात्राची व्यवस्था करून त्या जलपात्रामध्ये नियमित पाणी टाकल्या जात आहे.हा विद्यार्थ्यांसाठी बालवयातील प्रयोग उल्लेखनीय ठरत असून पक्ष्यांची तृष्णा तृप्ती होत आहे.

# डॉक्टर शहनाज अन्सारी यांची तालुका आरोग्यधिकारी म्हणून नवीन नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गदाना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय



अधिकारी डॉक्टर शाहनाज अन्सारी यांची तालुका आरोग्यधिकारी म्हणून नवीन नियुक्ती झाली असल्याची माहिती मिळाली असुण प्राथमिक आरोग्य केंद्रा नंतर तालुक्याची मोठी जवाबदारी त्यांना मिळाली आहे. प्राआकें पुरती जवाबदारी छोटी होती. तालुक्यात तीन आरोग्य केंद्र,१०-१५ उपकेंद्र, नवनवीन आरोग्य शासकीय योजना, अंगणवाड्या, आशा कार्यकर्त्यां, विविध शिबीरे,अचानक आलेले साथीचे रोग, तालुका भर शासकीय आरोग्य कार्य,बोगस डिग्री डॉक्टर (झोला डॉक्टर.मुन्ना भाई) आदि विविध मोठे आरोग्य कार्य तालुका आरोग्य अधिकारी यांच्या अंतर्गत येतात डॉक्टर शाहनाज अन्सारी मॅडम कसी हाताळणी करतात यावर अनेकांचे लक्ष आहे.कारण यापूर्वी बोगस डॉक्टर विरोधात तुरळक कारवाया झाल्या परंतु त्यांचा झोल सुरुच आहे.आदि अनेक कामे मॅडम ला उपलब्ध आहे.त्यांचे सहकारी कर्मचारी साह्यानं संजय पाटील, कनिष्ठ सहाय्यक संतोष चौधरी, आरोग्य साहयक ज्ञानेश्वर हरदे,आशासमुह प्रतिक्षा जाधव,लेखापाल संध्या मॅडम,राजकुमार दुर्गे आदिचे सहकार्य त्यांना लाभणार आहे.मॅडम डॉ.शाहनाज अन्सारी यांच्या नवनियुक्त बद्दल अभिनंदन होत आहे.



# वैजापुरात शांतता समिती बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील कायदा सुव्यवस्था व गुन्हेगारीवर नियंत्रित ठेवण्यासाठी शहर व ग्रामीण असे स्वतंत्र पोलीस ठाणे करण्याची मागणी शांतता समिती बैठकीत करण्यात आली. रमजान ईद, रामनवमी, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर वैजापूर पोलीस ठाण्यात शांतता समिती सदस्याची बैठक पोलीस निरीक्षक शामसुंदर कौठाळे यांच्या उपस्थितीत पार पडली.या बैठकीला माजी उपनगराध्यक्ष हाजी शेख अकील शेख गफूर, वैजापूर मर्चंट्स बॅंकेचे संचालक विशाल संचेती, नगरसेवक पारस घाटे, गणेश खैरे , बाजार समिती संचालक प्रशांत त्रिभुवन , सामाजिक कार्यकर्ते अमीर अली, काजी सदरोद्दीन यांच्यासह शांतता समिती सदस्याची उपस्थिती होती. शहराचा विस्तार वाढला आहे. पोलीसांचे संख्याबळ अतिशय कमी असल्याने पोलीसांना कायदा सुव्यवस्थेची स्थिती हाताळण्यासाठी पोलीस कर्मचा-यांवर मानसिक तणाव असतो त्यामुळे वैजापूर शहर व ग्रामीण अशी दोन वेगळी पोलीस ठाणे करण्याची गरज असल्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अमीर अली यांनी बोलताना व्यक्त केली या मागणीला सर्व उपस्थितांनी प्रतिसाद दिला.यावेळी आवेज खान यांनी उन्हाच्या तीव्रतेमुळे रमजान ईदसाठी रात्री ११ वाजेपर्यंत बाजारपेठेतील व्यवहार सुरु ठेवण्याची मागणी पोलीस निरीक्षक कौठाळे यांनी मान्य केली. वैजापूर पोलीस ठाणे हद्दीत रमजान ईद, रामनवमी आंबेडकर जयंती उत्सव सर्व धर्मीय समाज बांधवांनी आनंदमय वातावरणात साजरी करावे.या उत्सवा दरम्यान आचार संहिता तसेच कायदा सुव्यवस्थेचा भंग होईल अशी कृती करु नये. उत्सव दरम्यान पोलीसाकडून कायदा सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करणा-या लोकांवर कडक कारवाई करण्याचा इशारा त्यांनी बोलताना दिला.सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख, गुप्त वार्ता विभागाचे ज्ञानेश्वर मेटे, पोलीस कर्मचारी प्रशांत गिते यांच्यासह विविध गावातील पोलीस पाटील यांची बैठकीला उपस्थिती होती.




# दर्जेदार आरोग्य व्यवस्था हक्क; पण आपल्या जबाबदारीचीही जाणीव असावी

## चंद्रकांतदादा मोरे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** जागतिक आरोग्य संघटनेने यावर्षी "माझे आरोग्य माझा हक्क "अर्थात" माय हेल्थ माय राईट " हे घोषवाक्य घेऊन जगभर आरोग्यविषयक जनजागृती केली. चांगले, दर्जेदार आरोग्य, आरोग्यव्यवस्था हा आपला हक्क आहेच पण त्याचा आग्रह धरण्यापूर्वी आपले वयक्तिक त्याबरोबरच सामाजिक आणि एकंदरीत राष्ट्रीय आरोग्य कसं व्यवस्थित, नीटनेटके, निरोगी, संपन्न राहील, याबाबत आपण काळजी घेऊन आपलीही जबाबदारी पार पाडावी, "असे आवाहन चंद्रकांतदादा मोरे यांनी केले. जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्ग आणि समर्थ गुरुपीठाच्या वतीने राज्यभर आयोजित विविध उपक्रमांच्या प्रसंगी सेवेकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. राज्यभरातील निवडक 90 केंद्रावर जागतिक आरोग्य दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबीर, औषधी वाटप, योग, आयुर्वेद, आजीबाईचा बटवा असे विविध विषय घेऊन तज्ज्ञ सेवेकरी, डॉक्टर्स यांनी मार्गदर्शन केलं.90 केंद्रावर झालेल्या शिबिरात आठ हजार शंभर रुग्णांची तपासणी करून गरजेप्रमाणे मोफत आयुर्वेदिक व अलोपॅथीक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. पूर्वी घराघरात आजीबाईच्या बटव्यातील औषधी त्या घरास निरोगी ठेवण्याचे काम करीत पण काळाच्या ओघात या सहज उपलब्ध पण बहुगुणी औषधी वनस्पतीचा आपणास विसर पडला. हा बटवा पुन्हा पुनर्जीवीत कसा करता येईल याबाबत प्रशिक्षित सेवेकऱ्यांनी केंद्रावर मार्गदर्शन केले. सेवामार्गाच्या माध्यमातून गोरगरीब, गरजू रुग्णांना वरदान ठरणार असलेल्या सद्गुरू मोरेदादा हॉस्पिटलचे काम वेगाने सुरु असून यातील काही विभाग येत्या एक दीड वर्षात रुग्णसेवेस तयार होतील अशी माहितीही चंद्रकांत मोरे यांनी दिली.



# वेतन मिळावे म्हणून शिक्षक भारतीचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** निवडणूक कामाचे वेतन मिळावे म्हणून शिक्षक भारतीतर्फे तहसीलदार सुनील सावंत यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात मतदानाचे काम हे राष्ट्रीय काम असल्यामुळे कामासाठी अंगणवाडी सेविका यांचा नकार नसतो पण जेव्हा काम करतो तेव्हा शासनाने आमच्या कामाची दखल घेतली पाहिजे म्हणुन अंगणवाडी सेविकांच्या मानधना बाबत विचार करावे जसे शिक्षक व इतर अधिकारी कर्मचारी वर्ग त्यांना मतदान कामाचे मानधन दिले जाते. तसेच ज्या अंगणवाडी सेविका यांना मतदान दिवशी गाव स्तरावर मतदान कामासाठी नेमणुक केलेली आहे, त्यांना पण त्यादिवशी मानधन देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य पुर्व प्राथमिक अंगणवाडी शिक्षक भारती यांच्या मार्फत करण्यात आली आहे. याप्रसंगी सर्व अंगणवाडी शिक्षक भारतीच्या महिला पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# नाथदरबारी अखंड अन्नदान, प्रसादालयाचे ८ वे वर्ष

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** दक्षिण काशी असणाऱ्या पैठण या तीर्थक्षेत्राचा महिमा आपण सर्व जाणताच. दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या पैठण नगरीमध्ये ईतर राज्यातुनही रोज हजारोंच्या संख्येने भाविक नाथ समाधीच्या दर्शनासाठी येतात पण त्यांना भोजनप्रसाद देण्यासाठी एखाद्या अन्नछत्राची सोय इथे नाही ही खंत मनाला सारखी लागत होती. या तळमळीतून जगभर आध्यात्मिक गुरू म्हणून परीचीत असलेले स्वामी हरि चैतन्य महाप्रभु यांच्या संकल्पनेतुन नाथांच्या दरबारात भाविकांना भोजनप्रसाद देण्याच्या हेतूने आणि अन्नदानाचे महत्व लक्षात घेऊन सन २०१७ साली चैतन्य महाप्रभुच्या आशीर्वादाने श्रीहरी कृपा सेवा समीतीच्या वतीने शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज प्रसादालय भाविकासाठी सुरू करण्यात आले सेवाभावी वृत्तीने सुरु झालेल्या या भोजन रूपी यज्ञाला पैठणचे आमदार तथा संत एकनाथ महाराज संस्थान चे अध्यक्ष व पालकमंत्री संदिपान भुमरे यांनीही या प्रसादालयास अनुमती देत अन्नदात्यांना अवाहन केले व रोज अन्नदान करण्यासाठी हजारो हात पुढे आल्याने सात वर्षांपासून अखंड प्रसादरुपी भोजन आन्नदात्यांमुळे व भाविकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. तीर्थक्षेत्र असलेल्या नाथ दरबारी रोज परगावाहून आलेले हजारो भाविक रोज या प्रसादालयात भोजनप्रसादाचा लाभ घेत आहेत. एकादशी तसेच उत्सवकाळात हा आकडा हजारांहून अधिक असतो. याच कार्याची दखल घेत हरी कृपा सेवा समिती संचलित शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज सेवा समिती पैठण येथील प्रसादालयास केंद्र सरकारचे भोग प्रमाणपत्र...

भारतीय अन्न सुरक्षा प्राधिकरण यांच्या वतीने घेण्यात आलेल्या देश पातळीवर इट राइट स्पर्धेत पैठण येथील संत एकनाथ महाराज मंदिरातील हरिकृपा सेवा समितीच्या प्रसादालयाला स्वच्छ प्रसाद निर्मिती आणि वाटपासाठी केंद्र सरकारकडून भोग प्रमाणपत्र देण्यात आले आहे. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर वारकरी भाविकांसाठी सुरू केलेल्या या प्रसादालयात पोळी, भाजी, वरण, भात,एक स्विट अशा प्रकारे रोज अन्नदात्यांच्या हस्ते नाथांना नैवेद्य दाखवून १२ ते ३ या वेळेत आलेल्या भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था केली जाते.हरीकृपा सेवा समितीचे सेवेकरी ईथ



सेवा म्हणून काम करतात त्यामुळे ईथले बरेच काम सोपस्कार होते अन्नदान करणाऱ्या परिवारचा ईथे संत नाथ माऊलीची मुर्ती देवुन सन्मान केला जातो. गेल्या सात वर्षांत आनेक संत महंतांनी या अन्नछत्रास भेटी देवुन समाधान व्यक्त केले असल्याची माहिती हरिकृपा सेवा समिती संचलित शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज प्रसादालयाचे अध्यक्ष सतिष उदावंत यांनी दिली. दरवर्षी पाडव्याच्या निमित्ताने तसेच शुभारंभ प्रसंगी नाथ संस्थानचे अध्यक्ष तथा पालकमंत्री संदिपान भुमरे यांची पंगत असल्याने मार्केट कमेंटीचे सभापती राजु नाना भुमरे यांच्या हस्ते गुढीपाडवा दिवशी प्रसादलयात आरती करुन नाथ समाधीस्थळी नैवेद्य दाखवुन प्रसादास सुरवात करण्यात आली. यावेळी अंबडचे माजी आमदार शिवाजीराव चोथे, विलासबापु भुमरे यांची उपस्थिती होती. याठिकाणी हरिकृपा सेवा समितीचे अंकुश सेलुकर, भगवान मिटकरशिवाजी कोलते, सर्जेराव सोनवणे, विठ्ठल परदेशी, गणपत मिटकर, लक्ष्मण लाड जगन्नाथ काकडे, मारोती मोमेडवार, अंकुश म्हस्के, जिजा मिसाळ, अर्जुन भोसले, पंडितराव औटे, नंदकिशोर जोशी गुलाब सातपुते, प्रविण उदावंत, मुकुंद ठोसर, लिंबाजी चौधरी, परसराम करडवाल, बाबुराव बोंबले, सेवेकरी म्हणून काम पाहत आहेत.




# शेतकऱ्याच्या घामाची झाली फुले, एमबीबीएस झालीत दोन्ही मुले

## येवती येथील शेतकरीपुत्रांची यशोगाथा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** शेतकरी म्हटलं की, मग तो सधन असो अथवा अल्पभूधारक आथिर्क चणचण आणि विवीध अडचणी या कायमच्या पाचविला पुजलेल्याच. त्यामुळे आपसूकच शेतकऱ्यांची मुलं म्हटलं की शिक्षणाच्या बाबतीत जेमतेम बारावी किंव्हा जास्तीत जास्त कला शाखेतून पदवीधर हा एक सामाजिक दृष्टीकोनच होऊन बसला आहे. मात्र तालुक्यातील येवती या छोट्याशा गावातील शेतकरी संजय शिंदे व त्यांच्या पत्नी सौ. वर्षा शिंदे यांनी शेतात काबाडकष्ट करत योग्य संस्कार आणि सुयोग्य नियोजन करून मुलगा केतन व मुलगी आश्विनी यांना घडवलं आहे. त्यांच्या दोन्ही मुलांनी सुद्धा शेतकरी आसलेल्या आईवडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्य, बुद्धिमत्ता पणाला लावून कठोर परिश्रम घेत वैद्यकीय क्षेत्रातील मानाची समजली जाणारी एमबीबीएस पदवी प्राप्त केली आहे. परिणामी सोसलेल्या कष्टाची, घामाची फुले झाली असल्याचे समाधान शेतकरी शिंदे पतीपत्नीच्या चेहऱ्यावर झळकत आहे.

शेतकऱ्यांची पोरं शेतीच करणार ती उच्चविद्याविभूषित होऊच शकत नाहीत. हा एक गोड गैरसमज काही प्रस्थापितांनी समाजात पेरून ठेवला आहे. त्यामुळे शेतकरी मुलांचे सामाजिक खच्चीकरण होत चालले आहे. परिणामी आज कित्येक शेतकरी वरांना वधू मिळणे मुश्किल झाले आहे. याची सल व्यवसायाने शेतकरी असलेले संजय शिंदे व त्यांच्या पत्नी वर्षा शिंदे यांना कायम बोचत होती. या परिस्थितीला फाटा देण्याचा दोघा पतिपत्नीने मनोमन निश्चय केला आणि मुलगा व मुलगी दोन्ही अपत्यांना उच्चविद्यविभूषित करण्याचा संकल्प सोडला. हातात नेहमी अंदरबट्ट्यात असणाऱ्या शेती व्यवसायाशिवाय दुसरा कुठलाही आर्थिकस्त्रोत नव्हता. तरी सुद्धा त्यांनी आपल्या ईतर गरजांना लगाम लावून, पदरमोड करून मुलांचा शैक्षणिक खर्च भागवला. एव्हढेच नव्हे; तर ग्रामीण भागात असून सुद्धा मुलांनवर योग्य संस्कार केले. शिक्षणासाठी सुयोग्य मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. आईवडिलांचे संस्कार, ते करत असलेले काबाड कष्ट याची जाणीव केतन व आश्विनी यांच्या मनात कोरल्या गेली. आईवडिलांचे स्वप्न पुर्ण करण्याचा चंग दोन्ही बहीणभावाने मनाशी बांधला.आभ्यासातील सातत्य कायम ठेवले. कठोर परिश्रम घेत वैद्यकीय क्षेत्रातील मानाची समजली जाणारी एमबीबीएस पदवी प्राप्त केली आहे. ग्रामीण भागातील एका शेतकरी कुटुंबातील मुलं सुद्धा उच्चविद्यविभूषित होऊ शकतात हे प्रस्थापितांना दाखवून दिले आहे. परिणामी नैराश्याने ग्रासलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसमोर समाजात एक नवा आदर्शच त्यांनीं घालुन दिला आहे. त्यांनी मिळवलेल्या यशाचे सर्वच स्तरातून कौतुक केल्या जात आहे.सोबतच शिंदे दाम्पत्यावर सुद्धा अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




**पारंपारिक गैरसमज केला हद्दपार :** आज समाजात डॉक्टरचा मुलगा डॉक्टर, वकिलाचा मुलगा वकील, शिक्षकाचा मुलगा शिक्षक हे एक समीकरणच होऊन बसले आहे . परंतु शेतकऱ्याचा मुलगा मग शेती कितीही असो अखेर शेतकरीच होणार हा गोड गैरसमज जाणीवपूर्वक समाजमनावर बिंबवला गेला आहे . त्यामुळे आपसूकच शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक नैराश्याने ग्रासले आहे . त्यांची शैक्षणिक प्रगती खुंतली आहे . मात्र प्रबळ ईच्छाशक्तीच्या बळावर केतन आणि आश्विनी यांनी एमबीबीएस पदवी प्राप्त करून हा पारंपारिक गैरसमज हद्दपार केला आहे .

जगाचा पोशिंदा म्हणुन संबोधल्या जाणाऱ्या शेतकऱ्याला बळीराजा म्हटले जाते याचा सार्थ अभिमान आहे . कारण मी पण एका शेतकऱ्याची पत्नी आहे .पण समाजाचा शेतकऱ्यांच्या मुलांकडे बघण्याचा जो दृष्टिकोन आहे . याची खंत वाटत होती . तो आम्ही आमच्या दोन्ही मुलांना एमबीबीएस करून बदलला आहे . त्यामुळे आमच्या कष्टाचे घामाचे चीज झाल्याने खुप आनंद झाला आहे . **सौ . वर्षा संजय शिंदे, (पालक, येवती ता . रिसोड )**

# मुलीने केला आईचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वडगाव शेरी भागात मुलीने मित्राच्या मदतीने सख्ख्या आईचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रसाधनगृहात पाय घसरून पडल्याने आईचा मृत्यू झाल्याचा मुलीने बनाव रचला. मुंबईतील नातेवाइकाने तक्रार दिल्यानंतर पोलीस तपासात खुनाचा प्रकार उघडकीस आला आहे. मंगल संजय गोखले (वय ४५, राजश्री कॉलनी, वडगाव शेरी) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत गोखले यांचे नातेवाईक विनोद शाहू गाडे (वय ४२, रा. गोवंडी, मुंबई) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून मुलीसह तिच्या मित्राविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यश मिलिंद शितोळे (रा. गणेशनगर, वडगावशेरी) आणि योशिता संजय गोखले (वय १८, रा. राजश्री कॉलनी, वडगाव शेरी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगल गोखले यांच्या बँक खात्यातून मुलीने मित्राच्या मदतीने परस्पर पैसे काढले. ही बाब आईला समजल्यानंतर ती रागवेल, अशी तिला भीती होती. तिने आई झोपेत असताना तिच्या मित्राला घरातील हातोडा दिला. यशने मंगल यांच्या डोक्यात हातोड्याने वार करून जखमी केले. तसेच मुलगी योशिताने आईचे स्कार्फने तोंड दाबून धरले. हा प्रकार कोणाला कळू नये, यासाठी आई पाय घसरून पडल्याने तिच्या डोक्याला दुखापत झाल्याचा बनाव रचला, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# मग्रारोहयोची कामे यंत्राच्या साह्याने

## भोकर तालुक्यातील प्रकार : चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे मजुरांना काम मिळावे यासाठी शासनाने सुरू केले असले तरी तालुक्यात यंत्राच्या साह्याने कामे उरकण्यात आली आहेत. मस्टरवर मजुरांची नावे टाकून देयके उचलली जात आहेत. सदरील कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गतची कामे ग्रामपंचायतीना देण्यात आली आहेत, मागील वेळी बहूतांशी गावात मग्रारोहयो अंतर्गत "पेवर ब्लॉक" ची कामे देण्यात आली होती. काही ठिकाणी अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे उरकून देयके उचलण्यात आली. याबाबत तक्रारी करूनहि कार्यवाही करण्यात आली



नाही. सदर कामे गुत्तेदारी पद्धतीने करण्यात आली होती. मर्जीतील ग्रामस्थांच्या नावाने मस्टर भरण्यात आले. यंदा तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत बऱ्याच गावात कामे सुरू आहेत. घरकुल योजना व सिंचन विहिरीची कामे यंत्राच्या साहाय्याने करून मस्टर भरल्या जात आहे, नियमाची पायमल्ली करून होणाऱ्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# चिंता करू नका, भगवंताचे चिंतन करा : स्वामी अरुणनाथगिरिजी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** चिंता करू नका भगवंताचे चिंतन करा, यायचे माहित नाही अन् जायचे ही माहित नाही, जो आला आहे तो जाणार मग तो राजा असो वा रंग म्हणून भगवंताचे चिंतन केले पाहिजे. भगवंताचे चिंतन केले तरच सुख-समृध्दी, पद-प्रतिष्ठा प्राप्त होते. असे अडबंगनाथ संस्थान चे मठाधिपती स्वामी अरुणनाथगिरिजी महाराज यांनी वेरूळ येथील नाथ आश्रमात सुरू असलेल्या संगीतमय नवनाथ कथेत काल्याच्या किर्तनात बोलत होते. यावेळी संत जनार्दन स्वामी आश्रमचे मठाधिपती स्वामी शांतिगिरीजी महाराज, दत्ताश्रम टाका आश्रमचे मठाधिपती श्री विद्या वामदेवतिर्थ स्वामी, दिव्यानंद स्वामी महाराज, अन्नपूर्णा कैलास आश्रमाचे मठाधिपती अभयानंदस्वामी महाराज, नितीनअप्पा महाराज परभणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. काला हंडी सेवा सालाबाद प्रमाणे बंडूपंत गणपतराव सन्नानसे व सूर्यकांत नारायण सन्नानसे यांनी स्वीकारली होती.यावेळी नवनाथ कथेच्या सांगते प्रसंगी छ.संभाजीनगर, जालना, नाशिक, अहमदनगर, जळगाव जिल्ह्यातील हजारो भाविकांची उपस्थिती होती. गाथा नवनाथांची मालिकेतील कलाकारांची उपस्थिती. ह.भ.प.प.पू. सद्गुरू अक्काताई महाराज नाथ आश्रम श्री क्षेत्र वेरूळ आयोजित संगीत नवनाथ कथा कार्यक्रमास शनिवार, ६ एप्रिल, संध्याकाळी ७ वाजता सोनी मराठी वाहिनी वरील गाथा नवनाथांची मालिकेत मच्छिंद्रनाथांची भूमिका साकारणारे अभिनेते जयेश शेवलकर आणि जालिंदर नाथांची भूमिका साकारणारे अभिनेते वासुदेव मदने यांनी उपस्थिती लावली. श्री क्षेत्र वेरूळ च्या पावन भूमित कथा प्रवक्ते स्वामी अरूणाथगिरी महाराजांच्या नवनाथ कथांचा हजारो नाथभक्तांसोबत आनंद घेता आला याचे समाधान वाटते. अशी भावना कलाकारांनी व्यक्त केली.

# मुलीची मृत्यूची बातमी कळताच पित्यानेही गळफास घेऊन केली आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात पैशांअभावी १९ वर्षाच्या मुलीवर उपचार



करता न आल्याने तिचा मृत्यू झाल्यावरून खचलेल्या नगर पंचायतीचा निलंबित कर्मचारी असलेल्या पित्याने घरातच गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची घटना सोमवारी पहाटे उघडकीस आली. त्यानंतर, वेतन न दिल्याने त्यांच्या मृत्यूस मुख्याधिकारीच जबाबदार असल्याने त्यांच्यावर कारवाई करावी, या मागणीसाठी नातेवाइकांनी मृतदेह नगर पंचायतीच्या प्रवेशद्वारावर आणून आंदोलन सुरू केले. महसूल व पोलिस प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. दीपक प्रल्हाद राऊत वय ४५ असे मृताचे नाव आहे.नगर पंचायतीचे कर्मचारी दीपक प्रल्हाद राऊत यांना फेब्रुवारी महिन्यात निलंबित करण्यात आले होते. त्यामुळे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या तीन महिन्यांपासून त्यांना पगार मिळाला नव्हता. त्यातच त्यांची मुलगी वैष्णवी राऊत (वय १९ वर्षे) हिला पोटात त्रास होऊ लागला. त्यामुळे तिच्या उपचारासाठी निलंबन काळातील अर्धा पगार द्यावा, असा अर्ज तडवी यांच्याकडे दीपक राऊत यांनी दिला होता. तरीही त्यांना अर्धे वेतन मिळाले नाही. वैष्णवीच्या पोटदुखीचा त्रास वाढल्यामुळे तिला २ एप्रिल रोजी रात्री जळगाव येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. ३ एप्रिल रोजी वैष्णवीवर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर ती कोमात गेली. ७ एप्रिल रोजी पहाटे वैष्णवीचा मृत्यू झाला. त्यानंतर दुपारी तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्याजवळ पैसे नव्हते म्हणून आपली मुलगी गेली, या अपराधी झाले होते. याच अपराधी भावनेतून त्यांनी रात्री सर्वजण झोपी गेल्यानंतर घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी पहाटे उघडकीस आली. त्यामुळे त्यांचे नातेवाईक व नागरिक हादरून गेले. संतप्त नातेवाईक व नागरिकांनी दीपक राऊत यांचा मृतदेह नगर पंचायतीच्या दारात आणून ठेवला. राऊत यांचे वेतन थांबवून त्यांना आर्थिक अडचणीत आणणाऱ्या मुख्याधिकारी बबन तडवी यांच्यावर गुन्हा दाखल करावा व दीपक यांच्या पत्नीला शासकीय नोकरी द्या, या मागणीसाठी नातेवाइकांनी आक्रोश आंदोलन सुरू केले. याबाबत माहिती मिळताच प्रशासनाची धांदल उडाली. पोलिस व महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; परंतु ते न ऐकण्याच्या मनःस्थितीत होते. शेवटी नायब तहसीलदार व्ही. टी. जाधव व सहायक पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर दुपारी तीन वाजता नातेवाइकांनी मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.या दोन्ही घटनांची सोयगाव पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.




# शालिवाहनाची पालखी मिरवणूक काढून पैठणला तीर्थस्तंभावर उभारली गुढी

आधुनिक केसरी न्यूज

**दादा घोडके**

**पैठण :** सातवाहन साम्राज्याची राजधानी असलेल्या पैठणनगरीतून प्रस्थापित केलेल्या कालगणनेनुसारच ' शालिवाहन शके ' हे हिंदू नववर्ष जगभर साजरे केले जाते. पैठणला सम्राटांची पालखी मिरवणूक काढून त्यांनीच उभारलेल्या पुरातन 'तीर्थस्तंभा'वर गुढी उभारली जाते. यंदा ४२ वे वर्ष आहे. शक कर्ता शालिवाहन राजाच्या दैदिप्यमान कारकिर्दिचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पैठण येथे मराठी नववर्षाचा जनक  व पैठण भूमिपुत्र असलेल्या शालिवाहन राजाच्या प्रतिमेसह शालिवाहन शक शुभारंभ शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी पैठण ऐतिहासिक तीर्थखांबावर गुढी उभारून परंपरा जोपासण्यात आली. पैठण शहरात असलेल्या शालीवाहनाच्या राजवाड्याच्या बाजूला भव्य अशी दगडी शिल्पाची गुढी उभारली, आज यास तीर्थखांब म्हणून ओलखले जाते. मराठी नववर्षाच्या या दिनाशी शालिवाहनांचा वैभवशाली ईतिहास जोडलेला असल्याने पैठण नगरीस आजच्या दिनाचे महत्व असते.

यावेळीशालिवाहन बँकेचे  चेअरमन किशोर चव्हाण, भा.ज.पा चेशहराध्यकक्ष शेखर पाटील, रमेश खांडेकर, सागर पाटील, प्रा.संतोष गव्हाणे, शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवनशेठ लोहीया, देशमुख, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जितु परदेशी, दिनेश पारिख, तसेच शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.



# बाबासाहेबांचा अठरा तास अभ्यासाचा आदर्श विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर ठेवावा : प्रा. कोलते


आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत खडतर प्रसंगांना सामोरे जावून त्या विशेमतेच्या काळात १८-१८ तास अभ्यास केला व या देशाला आदर्श संविधान दिले. आजच्या इंटरनेट च्या या युगात विद्यार्थी अडकल्यामुळे ते वाचन, लिखानात माघे पडत चाले आहे. बाबासाहेबांचा हा १८-१८ तासाचा आदर्श विद्यार्थ्यांनी सावळदबारा येथे छत्रपती शिवाजी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सावळदबारा वतिने शिवाजी विद्यालय वाचनालयात पहिले पुष्प १८- अभ्यासिकेपासुन सुरूवात करण्यात आली. यावेळी तथागत भगवान गौतम बुध्द महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमीचे पुजन दिप धुप प्रज्वलीत प्राचार्य नारायण कोलते पाटील,सौ रत्नाताई पंजाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. संबोधित करताना प्रा.जीवन कोलते पाटील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ज्ञानाचा वसा विद्यार्थ्यांनी आपल्या जिवनामध्ये नाही अंगीकारावा जणे करून भारताची वाटचाल ही विश्व गुरू कडे होईल म्हणुन विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १८ तास अभ्यासाचा आदर्श डोळयासमोर  ठेवावा. यावेळी जयंती उत्सव शिवाजी विद्यालयाचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.प्रास्ताविक प्रा.डॉ.प्रवीण सरकटे यांनी केले. पंजाबराव शेळके यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.मदनभाऊ डोखळे यांनी परिश्रम घेतले आहेत. सर्व विद्यार्थी व गावातील पालक मान्यवर उपस्थित होते शाळेतील शिक्षकसर्व शिक्षक सर्व विद्यार्थी व शिक्षक विकास पाटील, विजयसिंग राजपूत, भास्कर ससाणे, संजय जोशी, भास्कर खमाट, मुकुंद व्यवहारे, सुदाम राठोड, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव सोनवणे, भूषण देसले, प्रा. जीवन कोलते पाटील, शाम जाधव, अजबराव चव्हाण, बाबासाहेब कोलते, राहुल बडक, गणेश मोहने, गणेश सत्रे, जयराम घोती, सतीश खवले, पंजाबराव शेळके, योगेश थोटे, सतीश गावंडे, जयराम घोती मनोहर पडोळ, संजय अमृतकर, शिवाजी सत्रे इत्यादी प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते तर सर्व विद्यार्थी व पालक तो जेष्ठ पत्रकार बंधू तथा दैनिक माझा मराठवाडा मराठवाड्याचे संपादक गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण, सुनील चोरमले, जब्बार एस तडवी सर्व पालकांचे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार शिवाजी सत्रे यांनी मानले.

# अनुसयाबाई कोलते अनंतात विलीन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील प्राचार्य नारायण कोलते पाटील यांच्या काकू व जीवन आबाराव कोलते यांच्या आजी कै.ग.भा.अनुसयाबाई बाबुराव कोलते यांचे सोमवार रोजी वयाच्या 95 व्या वर्षी आज दि.०८/०४/२०२४ रोजी दुपारी ४.०५ मिनिटांनी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंतीम संस्कार अंत्यविधीचा कार्यक्रम मंगळवार दि.०९/०४/२०२४ ला ठीक सकाळी १०.०० वाजता सावळदबारा येथील कोलते परिवाराच्या मोक्षधाम भूमीत करण्यात आला.




त्यांच्या पश्चात सुना, नातवंडे, जावई,मुले,मुली,असा खूप मोठा एकत्र कोलते परिवार आहे. त्यांच्या जाण्याने कोलते पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे या दुःखातून त्यांच्या कुटुंबीयांना सावरण्याची शक्ती परमेश्वर देवो असे भावपूर्ण श्रद्धांजली आर एस चव्हाण सर त्यांनी वाहिली.अंतिम संस्कार प्रसंगी छत्रपती संभाजीनगर, सोयगाव, जळगाव,सिल्लोड, बुलढाणा, फत्तेपूर व सावळदबारा परिसरातील मोठा नातेवाईक मंडळी व  जनसमुदाय उपस्थित होता.

# काँग्रेसवर टीका करताना मुनगंटीवारांची जीभ घसरली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर-वणी-आर्णी मतदारसंघातील भाजपचे उमेदवार



सुधीर मुनगंटीवार यांची जीभ घसरल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. या सभेत मुनगंटीवार यांनी काँग्रेसवर टीका करताना असभ्य भाषेचा वापर केला. मुनगंटीवार यांनी भाषणात काँग्रेसविरोधात वापरलेल्या भाषेबाबत आता जिल्ह्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

स्थानिक मोरव्याच्या प्रांगणात पंतप्रधान मोदींची भव्य निवडणूक रॅली आयोजित करण्यात आली होती. भाजपचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ आयोजित या जाहीर सभेत पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीपूर्वी मुनगंटीवार यांनी भाषणाला सुरुवात केली, मात्र भाषणादरम्यान मुनगंटीवार यांनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले. त्यांचे भाषण, शब्द आणि भाषा वाईट वापरल्याने सभेला उपस्थित श्रोत्यांचे विशेषतः महिलांच्या माना शरमेने झुकले. मुनगंटीवार यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर टीका करताना भाऊ-बहिणींना गळफास लावणारा आणि एकाच बेडवर झोपवणारा पक्ष असे वर्णन केले. मुनगंटीवार यांच्या तोंडून असा शब्दप्रयोग ऐकून उपस्थित श्रोते अवाक झाले. उच्च विद्या विभूषित मुनगंटीवार यांच्याकडून अशा असंस्कृत भाषेचा वापर झाल्याने समाज माध्यमावर ट्रोल होत आहे.

# मनोज जरांगे पाटील यांचा प्रवास आता रूपेरी पडद्यावर

## 'संघर्षयोद्धा' मनोज जरांगे पाटील चित्रपट येत्या २६ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी संघर्ष करत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आयुष्याचा वेध घेणारा 'संघर्षयोद्धा' मनोज जरांगे पाटील हा चित्रपट येत्या २६ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यासाठी आता सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा मुहूर्त हा जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे करण्यात आला होता आणि आता या चित्रपटाच्या प्रमोशनला ही येथूनच सुरुवात करण्यात आली आहे. शिवाजी दोलताडे यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी निभावलेली असून सोनाई फिल्म क्रिएशन या निर्मिती संस्थेच्या गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाच्या निर्मितीसह चित्रपटाचं लेखनही केलं आहे. सहनिर्माते रामदास मेदगे, जान्हवी मनोज तांबे, दत्तात्रय लोहकरे कार्तिक दोलताडे , नर्मदा सिनेव्हिजन्स हे आहेत. तर डॉ.सुधीर निकम यांनी संवाद आणि पटकथा लिहिली आहे. या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका अभिनेता रोहन पाटील यांनी साकारली आहे. "संघर्षयोद्धा" हा माझा पहिलाच बायोपिक आहे. याआधी मी मुसंडी, मजनू , धुमस असे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. एखाद्या काल्पनिक गोष्टींवर चित्रपट बनवणे हे जरा सोपे असते कारण त्यात आपण काही गोष्टी या जोडू शकतो परंतु एखाद्या चालू घडामोडींवर चित्रपट हे तेवढेच कठीण असते. त्यामुळे हा चित्रपट बनवणे माझ्यासाठी मोठे चॅलेंज होते. पण वेळोवेळी मला स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी आणि त्यांच्या टीमने योग्य ती मदत केली हे मी नक्कीच नमूद करू इच्छितो. आणि त्यामुळेच हे मी शिवधनुष्य पेलू शकलो असे दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले. मी स्वतःला खुप भाग्यवान समजतो की मनोज जरांगे पाटील यांची व्यक्तिरेखा मला करायला मिळाली. आजवर अनेक वेगवेगळ्या चित्रपटातून मी  भूमिका मी केल्या आहेत पण या चित्रपटातील ही व्यक्तिरेखा मला खुप काही देऊन गेली आहे. संघर्षातून उभे राहून आज ते एका वेगळ्या उंचीवर पोहचलेले आहेत. त्यांचे हावभाव आणि अन्य गोष्टींचा मी बारकाईने अभ्यास केला आहे आणि त्यांची सुद्धा मला तेवढीच साथ लाभली आहे. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास नक्कीच बघण्यासारखा आहे आणि तुम्ही हा चित्रपट नक्कीच जाऊंन प हाल अशी मला खात्री असल्याचे अभिनेता रोहन पाटील यांनी सांगितले.




मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष हा खडतर असून संपूर्ण जगाला समजावा यासाठी मी या चित्रपटाची निर्मिति करण्याचा निर्णय घेतला. केवळ व्यक्तीसाठी न लढता समाजासाठी आज ते लढत आहेत ही छोटी गोष्ट नाही. त्यांनी आजवर अनेक उपषोण केली हार मानली नाही. माझे मी भाग्य समजतो की या चित्रपटाची निर्मिति करण्याची सुवर्णसंधी मला मिळाली असे चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलताडे यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या टीज़रला सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद मिळाला होता आणि त्यानंतर सुप्रसिद्ध गायक अजय गोगावले यांच्या सुमधुर आवाजातील हृदयाला भिडणाऱ्या "उधळीन जीव..." या गीताने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. या चित्रपटात अभिनेता संदीप पाठक, सागर कारंडे, अरबाज शेख, अभिनेते मोहन जोशी, श्रीनिवास पोकळे, संजय कुलकर्णी, अभिनेत्री सुरभी हांडे,  माधवी जुवेकर, विजय मिश्रा, विनीत भोंडे, सुनील गोडबोले, माधव अभ्यंकर, सोमनाथ अवघडे , किशोर चौगुले , सिद्धेश्वर झाडबुके, उर्मिला डांगे यांच्या ही प्रमुख भूमिका आहेत.

# लामणगाव फाटा ते लामणगाव गावाकडे रस्त्याची नव्याने दुरुस्ती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील लामणगाव फाटा ते लामणगाव गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची तक्रार व काम बंद पाडण्याच्या प्रकारा नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदाराकडून रस्ता नव्याने दुरुस्ती करण्यात आली. लामणगाव फाटा ते लामणगाव गावा कडे जाणाऱ्या रस्ता खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत ठेकेदार करवी काम हाती घेण्यात आले होते. कोटी रुपयांचे काम थातुरमातुर होत असल्याने अनेक नागरिक पदाधिकारी यांनी तक्रार करुन काम बंद पाडले होते परंतु उपविभागीय उप अभियंता कोलते, जेई सावजी, जेई चव्हाण यांनी रस्ता काम चांगला करून घेण्याचे आश्वासन दिले होते.व ते ठेकेदारांकडून नव्याने डांबरीकरण मजबुतीकरण काम,पंखे भरणे आदि काम करून घेण्यात आले तर अद्यापही रस्त्यांच्या बाजु पंखे भरणे काम काही ठिकाणी  अपूर्ण दिसून आले.परंतु आता डांबरचा चांगला वापर करुन मजबुतीकरण काम करण्यात आले आहे.दैनिकाने सतत पाठपुरावा केला. रस्ता नादुरस्त पासून ते नव्याने काम चालू व थातुरमातुर काम बद्दल. याची विभागाने दखल घेऊन काम केले आहे. पुल कामात चालढकल होत आहे. या रस्त्या दरम्यानच पुल काम हाती घेण्यात आलेले आहे परंतु पुल कामाचे खड्डा खोदून कामा विनाच पडून आहे. कामात अनियमितता चालू बंद सुरु असल्याने पुल काम रेंगाळून असल्याचे चित्र आहे.




# डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत गावपातळीवरील प्रथम प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** प्रकल्प संचालक आत्मा छत्रपती संभाजीनगर बी.एस. तौर, प्रकल्प उपसंचालक आत्मा छत्रपती संभाजीनगर अनिल कुलकर्णी व तालुका कृषि अधिकारी मदन शिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत सोयगांव तालुक्यात स्थापन करण्यात आलेल्या १० गटांचे गांवपातळीवरील प्रथम प्रशिक्षण वरखेडी खु, वेताळवाडी, पिंपळा व नांदागांव येथे दिनांक – ०३ एप्रिल २०२४ रोजी, गलवाडा (ब) येथे दिनांक – ०४ एप्रिल २०२४ रोजी, निंबायती व घोरकुंड येथे दिनांक – ०५ एप्रिल २०२४ रोजी, बनोटी तांडा येथे दिनांक – ०६ एप्रिल २०२४ रोजी तसेच शिंदोळ व मुखेड येथे दिनांक – ०८ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षणात प्रामुख्याने योजनेची व सेंद्रिय शेतीची संकल्पना उद्देश आणि कार्यपद्धती, नैसर्गिक व सेंद्रिय शेती पशुधनाचे महत्त्व, बिजामृत तयार करून बिजप्रक्रिया करणे, शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व कार्यपद्धती, पिक नियोजन, सापळा पिक, आंतरपिक लागवाड, मूलस्थानी जलसंधारण, माती व पाणी परीक्षणाचे महत्व, स्वनिर्मित निविष्ठाचा वापर, पिक अवशेषांचे कंपोस्ट करणे, नैसर्गिक शेती करण्यासंबंधी शपथपत्र या बाबत मार्गदर्शन आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेनुसार संपत वाघ मंडळ कृषि अधिकारी बनोटी, रमेश गुंडिले मंडळ कृषि अधिकारी फर्दापुर, हेमंत देशमुख कृषि पर्यवेक्षक, अमोल महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, विवेक शेळके तंत्र सहाय्यक, लखन गवळे तज्ञ मार्गदर्शक, आरती बावस्कर, विश्वजित तायडे, मानसिंग भोळे, अर्जुन सुरळकर, विजयसिंग निकुंभ, बी.आर.चौरे, कैलास कुमावत, राधिका साळुंके, प्रशांत जाधव, ललिता साळवे कृषि सहाय्यक व संबंधित गावातील रिसोर्स बँकेतील शेतकरी यांनी केले.



सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात स्थापन करण्यात आलेल्या गटातील सर्व सदस्य, गावाचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# जि.प. प्रा. शा. लामनगाव येथे मतदान जनजागृतीसाठी घेण्यात आली प्रतिज्ञा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे लामणगाव जिल्हा परिषद शाळेत शिक्षकवृंद, नागरिक यांनी होय, मी मतदान करणारच अशी शपथ प्रतिज्ञा घेवून जनजागृती करण्यात आली आहे. या प्रसंगी शालेय अध्यक्ष किशोर मालोदे, उपसरपंच अशोक मालोदे, गावकरी व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी संदीप सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि निष्ठावंत सैनिक आनंद दिघे यांच्या विचारधारेवर चालणारे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या आदेशाने शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष धनंजय भास्करराव जाधव आणि प्रदेश उपाध्यक्ष नाथराव कराड व कार्याध्यक्ष प्रल्हाद इंगोले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी शिरूर कासार तालुक्यातील खंबा या ग्रामीण भागातील निष्ठावंत शिवसैनिक संदीप सुनील सोनवणे यांची निवड केली आहे. या निवडीबद्दल त्यांचे शेतकरी वर्गातून अभिनंदन होत आहे.

शिरूर कासार तालुक्यातील खंबा या ग्रामीण भागात सुनील सोनवणे यांनी शिवसेनेचे रोपटे 30 वर्षांपूर्वी माजी मंत्री प्राध्यापक सुरेश नवले यांच्या नेतृत्वाखाली लावले. आपल्या वडिलांचा आदर्श समोर ठेवून संदीप सोनवणे यांनी देखील बालवायातच शिवसैनिक म्हणून जबाबदारी स्वीकारली. पुढे शिवसेनेतील त्यांची निष्ठा पाहता साधारण पाच वर्षांपूर्वी त्यांना शिवसेनेने शिरूर कासार उप तालुका प्रमुख पदी संधी दिली. दरम्यान 2 वर्षांपूर्वी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या विचारांवर प्रभावित होऊन शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक बापू खांडे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. मागील 2 वर्षात शिंदे सेनेत निष्ठावंत शिवसैनिक आणि काही महिन्यापूर्वी शेतकरी संवाद यात्रेमध्ये संदीप सोनवणे यांनी दाखवलेला सक्रिय सहभाग शेतकरी सेनेच्या राज्य कार्यकारिणीने लक्षात घेऊन त्यांना पक्षीयनिष्ठा म्हणून शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष धनंजय भास्करराव जाधव आणि प्रदेश उपाध्यक्ष नाथराव कराड तसेच कार्याध्यक्ष प्रल्हाद इंगोले यांच्या नेतृत्वाखाली 31 मार्च 2024 रोजी शिर्डी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीमध्ये शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करून निवडीचे पत्र दिले. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. निवडीनंतर नूतन शिवसेना प्रणित शेतकरी शिवसेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष संदीप सोनवणे म्हणाले, माझ्यावर पक्षाने जी विश्वासाने जबाबदारी दिली आहे त्याच विश्वासाने मी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करेल. आणि बीड जिल्ह्यात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब आणि शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे हात बळकट करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी या पदाचा प्रामाणिक प्रयत्न करेल असे आश्वासित केले.

# रावेरमधून लढण्यास रोहिणी खडसेंचा नकार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जळगावमधील रावेर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार निश्चितीसाठी पुण्यातील मोदीबागेत सोमवारी खलबते रंगली. पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्यासह भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी, रवींद्र पाटील, श्रीराम पाटील यांनी शरद पवार यांची मोदीबागेत भेट घेतली. मात्र रोहिणी खडसे यांनी रावेरमधून निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे जाहीर केले. जयंत पाटील यांनीही इच्छुकांबरोबर चर्चा झाली असून, मंगळवारी निर्णय जाहीर केला जाईल, असे सांगितले. रावेर लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या स्नूषा, विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून कोण उमेदवार असेल, याबाबत दावे-प्रतिदावे सुरू झाले होते. त्यातच एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे याही निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे रावेर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीचा तिढा वाढला होता. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या पुण्यातील मोदीबाग या निवासस्थानी दुपारी खलबते रंगली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह रोहिणी खडसे यांनी इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. त्यानंतर रोहिणी खडसे यांनी निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. रावेरमधील उमेदवाराच्या नावाची घोषणा मंगळवारी केली जाईल. या मतदारसंघातून माझ्या उमेदवारीचा प्रश्नच येत नाही. इच्छुकांसाठी मी आग्रही असून यासंदर्भात शरद पवार आणि जयंत पाटील यांच्यासमवेत चर्चा झाली आहे. त्यानुसार उमेदवाराचे नाव जाहीर केले जाईल.



# मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी 'गुढीपाडवा मतदान वाढवा' उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आज दिनांक 08 एप्रिल रोजी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या आदेशानुसार व उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पाडवा या सणानिमित्त मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी गुढीपाडवा मतदान वाढवा या उपक्रमाचे आयोजन विनायकराव पाटील महाविद्यालयाच्या सभाग्रहात करण्यात आले होते. या प्रसंगी तहसिलदार वैजापुर सुनिल सावंत सदर उपक्रमाचे अनुषंगाने सर्व क्षेत्रीय अधिकारी नोडल ऑफिसर व संबंधित कर्मचारी यांना करावयाच्या कामकाजा बद्दल सुचना दिल्या.

जिल्हाधिकारी यांच्या निर्देशा नुसार सर्व ग्रामपंचायत हद्दीमध्ये विविध उपक्रम व जनजागृतीचे कार्यक्रम घेऊन मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले असून रथ यात्रेद्वारे स्वाक्षरी मोहीम राबवुन गावा गावा मध्ये मतदानाची टक्के वारी वाढवीण्यासाठी जनजागृती केली. चैत्र शुद्ध प्रतिपदा या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात नवीन वर्षांच्या पहिल्या दिवसानिमित्त गुढीपाडवा हा सण साजरा करण्यात येतो यावर्षी हा सण गुढीपाडव्याच्या प्रवाह जनजागृतीचा जोड देणे उत्कृष्ट ठरेल या अनुषंगाने विनायक पाटील महाविद्यालय सभागृह येथे दिनांक 08 एप्रिल रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती या बैठकीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,गटशिक्षणाधिकारी यांच्या सह सर्व क्षेत्रीय अधिकारी सर्व कार्यालय प्रमुख अंतर्गत सर्व मंडळ अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी दिलीप त्रिभुवन अव्वल कारकून व दीपक त्रिभुवन यांनी देशभक्तीपर गीत गायन करून मतदानाची महत्व लोकांना पटवून दिले व मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे दृष्टीने शाहीर अशोक बागुल यांनी देशभक्तीपर गीत गायन सादर केले. तसेच सर्व ग्राम स्तरावर संबंधित तलाठी ग्रामसेवक यांनी गावांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवावी व लोकशाही बळकट व्हावी या दृष्टिकोनातून विविध उपक्रमांचे आयोजन केले व जनजागृती केली गावागावांमध्ये मतदानाची जागृती करणारा रथ फिरवून स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. या उपक्रमात सर्व क्षेत्रीय अधिकारी,नोडल ऑफिसर,नायब तहसीलदार, गटविकास अधिकारी,तालुका कृषी अधिकारी, मुख्याधिकारी नगरपरिषद, तलाठी, ग्रामसेवक व कार्यकर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

# जनतेने कोणत्या विकासाला बघून मतदान करायचे ? : रविभाऊ पुप्पलवार

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत असताना भाजपचे उमेदवार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या विकासकामांवर पुन्हा एकदा आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलवार यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. मतदारसंघातील सरकारी शाळांची दयनीय अवस्था, सरकारी रुग्णालयातील गैरसोय, पिण्याच्या पाण्याची समस्या, 2019 पासून वीज खंडित असलेले बल्लारपूर शहरातील पशुवैद्यकीय रूग्णालय, थोडाश्या पावसाने देखील पाण्याने भरणारा गोल पुलिया, शहरातील नवीन रोडांची खराब अवस्था, वीज खांबांवरील गायब झालेले मोरपंख, वाढते प्रदुषण, शहरातील उद्योग धंद्यांची होत चाललेली अधोगती या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून फक्त बगिच्यांच्या आणि बसस्टॉप चा विकास बघून मतदान करायचा का? असा प्रश्न रविभाऊ पुप्पलवार यांनी उपस्थित केला आहे. वीजेच्या युनिट चे वाढते दर, पाण्याचे अवाढव्य बील , बेरोजगारी, महागाई ने जनता त्रस्त असतांना फक्त बगीचे, बसस्टॉप व इमारती बांधणारा उमेदवार कोणत्या कामाचा? हा विकास कमिशनच्या वजणा खाली नाही का? यावर जनतेने नक्कीच विचार करायला पाहिजे असे देखील पुप्पलवार म्हणाले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com

sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# विकसित भारतासाठी भाजपाला विजयी करा

## योगी आदित्यनाथ यांचे भंडारा येथील जाहीर सभेत प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मोदी सरकार तुष्टीकरणासाठी नव्हे तर 140 कोटी जनतेच्या संतुष्टीसाठी झटत आहे असे प्रतिपादन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी भंडारा-गोंदिया येथे केले. महायुतीचे उमेदवार - भारतीय जनता पार्टीचे खा.सुनील मेंढे यांच्या प्रचार सभेत योगी आदित्यनाथ बोलत होते. विकसित भारत आणि विकसित भंडारा-गोंदिया साठी पुन्हा एकदा मोदी सरकार आणि महायुतीचे श्री.मेंढे यांच्या विजया शिवाय दुसरा कुठलाच पर्याय नाही असे ही ते म्हणाले. सोमवारी भंडारा इथे झालेल्या प्रचार सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा.प्रफुल्ल पटेल, महायुतीचे उमेदवार खा.सुनील मेंढे, माजी मंत्री परिणय फुके, जयदीप कवाडे आदी उपस्थित होते. गरीब, महिला, शेतकरी आणि युवा कल्याणासाठी विविध योजना राबवून एनडीए सरकार बलशाली भारत निर्माण करत आहे त्याला साथ देण्यासाठी श्री.मेंढे यांना विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

योगी आदित्यनाथ म्हणाले की मागच्या 10 वर्षांत मोदी सरकारने छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार केले आहे. दहशतवादाचा बिमोड करून देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य एनडीए सरकारने दिले. मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कुणाही समोर न झुकता अविरत विकास कार्य करून जगाच्या पटलावर आपल्या देशाची प्रतिमा उज्वल केली आहे. भारताची अर्थव्यवस्था जगात तिस-या स्थानी न्यावयाची असेल तर पुन्हा तिस-यांदा मोदी सरकारला विजयी करा असेही ते म्हणाले.



# आ. जोरगेवार यांनी केले बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या पुण्यतिथी निमित्त खोब्रागडे परिवारच्या वतीने खोब्रागडे भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी राजाभाऊ खोब्रागडे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

यावेळी बाळु खोब्रागडे, देशक खोब्रागडे, माझी नगर सेवक पप्पू देशमुख, सुलभ खोब्रागडे, मारोतराव खोब्रागडे, अक्षय येरगुडे, राजु शेंडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आणि समाजप्रबोधक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी आपले अवघे जीवन समाजाच्या उन्नतीसाठी आणि समाजातील भेदभाव मुळापासून उखडून टाकण्यासाठी संघर्ष केला. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे १८ वर्ष राज्यसभेचे खासदार राहिले. उच्च शिक्षण घेतल्यानंतर समाजासाठी काहीतरी करा हे शब्द त्यांनी मनात पक्के ठेवत स्वतःला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत झोकून दिले. पूढे आंबेडकरी चळवळीचे निष्ठावान नेते म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. त्यांचे विचार आणि जीवन कार्य सदैव आमच्यासाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी राहतील असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

# जिल्हाधिकाऱ्यांची मतदान प्रशिक्षण केंद्राला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विधानसभा मतदार संघात नियुक्त मतदान कर्मचा-यांचे दुसरे प्रशिक्षण कॉर्मेल अकॅडमी येथे आयोजित केले होते. या प्रशिक्षण केंद्राला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भेट देऊन मतदान पथकांना 19 एप्रिल 2024 रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने सूचना दिल्या. यावेळी ते म्हणाले, सर्वांनी निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे अचूक कामकाज करावे. उन्हाळा असल्याने आपली स्वतःची व मतदान केंद्रात येणाऱ्या मतदारांची काळजी घ्यावी. मतदान केंद्रावर लाईटची व्यवस्था, पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प आणि व्हीलचेअर आदी बाबी असणे गरजेचे आहे. तसेच तापमान जास्त असल्यामुळे मतदारांना सावलीकरीता पेंडॉलची व्यवथा करण्यात यावी, ईव्हीएम योग्य पध्दतीने हाताळावे, अशा सुचना त्यांनी दिल्या. या प्रशिक्षणात मतदान पथकांना निवडणूक प्रकियेची सविस्तर कायदेशीर माहिती देण्यात आली. तसेच ईव्हीएम हाताळणीसाठी हॅन्डस् ऑन ट्रेनिंग देण्यात आले. मतदान कर्मचा-यांसाठी पोस्टल मतदान कक्ष सुरु होता. यावेळी सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, तालुका कृषी अधिकारी भास्कर गायकवाड, तालुका आरोग्य अधिकारी कोमल मुनेश्वर व त्यांचे पथक आदी उपस्थित होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती जल्लोषात साजरी करा : भास्कर सुरडकर

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे कायदा व सुव्यवस्थेचे पालन करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात आणि जल्लोषात मोठ्या थाटामाटात साजरी करा, असे प्रतिपादन विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर रमाई नगर सावळदबारा येथील अध्यक्ष भास्कर प्रल्हाद सुरडकर यांनी केले आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या वेळी आयोजित बैठकीत ते बोलत होते.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीतर्फे जळगाव येथील वंचितचे सोयगाव तालुका अध्यक्ष मनोहर जगताप यांचे अध्यक्षतेखाली गावातील आंबेडकरवादी नागरिकांची तसेच उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे नियोजन करून विविध कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात आणि जल्लोषात साजरी करीत असताना आनंद उत्सवाला "उन्मादाचे स्वरूप" देऊ नका. उन्मत्त होऊन मिरवणुकीत उन्मादाचे विकृत प्रदर्शन न करता संयम, शिस्त, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करत मिरवणुकीत येथेच्छ नाचून आनंदाचा उत्सव साजरा करावा. बॅरिस्टर, समाजशास्त्रज्ञ, राज्य शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची जयंती आहे. याचे भान ठेवत जयंती मोठ्या थाटामाटात आनंदात उत्सव साजरा करा, असे आवाहन अध्यक्ष भास्कर प्रल्हाद सुरडकर यांनी जयंती उत्सव समितीच्या वेळी बैठकीत केले.यावेळी भीमसैनिक, ग्रामस्थ व उत्सव समितीचे आदीसह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती कोषाध्यक्ष दिलीप सुरडकर यांनी बोलताना दिली.

# नाना पटोलेंनी इतिहासाबद्दल माहिती घेऊन बोलावे : माधव भंडारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** स्वातंत्र्यपूर्व काळातील बंगाल प्रांताच्या सरकार स्थापनेवेळी भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी मुस्लीम लीगशी नव्हे तर फजलूल हक यांच्या कृषक समाज पार्टीशी आघाडी केली होती. काँग्रेस - मुस्लीम लीगला सत्तेत येण्यापासून रोखण्यासाठी डॉ.मुखर्जी यांनी कृषक समाज पार्टी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फॉरवर्ड ब्लॉक शी आघाडी केली होती, हा इतिहास आहे. इतिहासातील घटनांबद्दल बोलताना नाना पटोले यांनी पूर्ण माहिती घेऊनच बोलावे, असा टोला भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी लगावला आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी बंगाल प्रांतात मुस्लीम लीगशी युती केली होती, अशी धादांत खोटी माहिती प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी अलीकडेच प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. भांडारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे त्यावेळच्या घटनांची तपशीलवार माहिती देत नाना पटोले यांचा जोरदार समाचार घेतला आहे. भांडारी यांनी पत्रकात म्हटले आहे की, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी अलीकडेच इतिहासाबद्दलचे आपले अगाध ज्ञान पाजळले आहे. नाना पटोले ज्या बंगाल मंत्रिमंडळाबद्दल बोलले आहेत ते सरकार मुस्लीम लीगचे नव्हते. त्या सरकारचे मुख्यमंत्री होते कृषक समाज पार्टीचे फजलूल हक. फजलूल हक हे समाजवादी विचारांचे आणि कट्टर मुस्लीम लीग विरोधी म्हणून ओळखले जात होते . काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांना सरकार बनविण्यापासून रोखण्यासाठी डॉ. मुखर्जी यांच्या नेतृत्वाखालील हिंदू महासभा,नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा फॉरवर्ड ब्लॉक आणि फजलूल हक यांचा कृषक समाज हे तीन पक्ष एकत्र आले होते. फजलूल हक यांच्या कृषक समाज पक्षाने मुस्लीम लीग च्या फाळणीच्या ठरावाला विरोध केला होता. अशा प्रखर राष्ट्रवादी विचारांच्या फजलूल हक यांच्याशी डॉ. मुखर्जी यांनी हातमिळवणी केली होती. डॉ. मुखर्जी यांनी मुस्लीम लीगशी कधीच आघाडी, समझोता केलेला नव्हता. उलट काँग्रेसचा इतिहास मुस्लीम लीगबरोबरच्या मैत्रीचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहासाचा अभ्यास करणे जमत नसेल तर किमान इतिहास समजून तरी घ्यावा आणि मगच बोलावे, असेही भांडारी यांनी पत्रकात नमूद केले आहे.



# समाजसेवक सुमीत पंडित यांना राष्ट्रीय कला गौरव पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सुमित पंडित हे समाज उपयोगी विविध ४२ उपक्रम राबवितात तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. श्री शिवाजी हायस्कूल बुलढाणा येथे कलागौरव पुरस्कार -२४ व बुलडाणा लघुपट महोत्सव -२४ संपन्न झाला. कार्यक्रमाला राज्यभरातून पुरस्कार्थी उपस्थित होतो तसेच प्रमुख पाहुणे मोहन काळे, गजानन बापू देशमुख, विठ्ठलराव खरात, भावसार मॅडम, प्रेमकुमार इंगळे, शशीकांत इंगळे, अशोक सुर्यवंशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात समाजसेवक सुमित पंडित यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ते करीत असलेल्या रजंल्या गांजल्याची सेवा खरचं समाजापुढे वाखाडण्याजोगी आहे, रस्तावर फिरणाऱ्या मनोरुग्णांची दाढी केस कापून स्वच्छ अंघोळ घालुन त्यांना मनोविकृती रुग्णालयात कागदोपत्री पुर्तता करुन उपचारासाठी दाखल करतात, शासकीय रुग्णालयात गरजु रुग्णांना अर्ध्या रात्री मेडिकल साहित्य, भोजन, रक्त, पुरविण्यात ही जोडी देवदुतासारखी मदतीला धावुन जाते, बेवारसांचे अत्यंविधी सुध्दा हे दापत्य माणुसकी समुहाच्या माध्यमातून करतात, सुमित यांची पत्नी पुजा पंडीत सध्या संभाजीनगर ( औरंगाबाद ) येथे रोडवरील बेवारस अवस्थेत सापडलेल्या वृध्दाचा वृध्दाश्रमात सांभाळ करते, जटवाडा रोड येथे माणुसकी वृध्द सेवालय देखील वृध्दाच्या सेवेसाठी मदतकार्य करते,म्हणूनच त्याच्या या सामाजिक कार्याची दखल घेत,त्यांना उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले बुलढाणा फिल्म सोसायटी यांच्या वतीने विवीध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा बुलढाणा येथे दिनांक ७-४-२०२४ रोजी आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजक सुरज भास्कर वाडेकर, सुरज वाडेकर, राजू गवई, अभिलाष चौबे, संतोष शिंगणे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते,या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्रेमकुमार इंगळे यांनी केले होते. या आधी सुमित पंडित यांना विविध ९७ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे त्यांचा हा ९८ वा पुरस्कार जाहीर झाला आहे. ह्या पुरस्कारामुळे समाजसेवक सुमित पंडीत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गारपिटीमुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मराठी नववर्षाची गुढीपाडव्याची पहाट वरूड, मोर्शी आणि चांदूर बाजार तालुक्यातील मोसंबी, संत्रा उत्पादकांसाठी संक्रांत घेऊन आली. गारपिटीने मोसंबी, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना जबर आर्थिक फटका दिला आहे. वरूड तालुक्यातील वघाळ, वाडेगाव, लोणी परिसर, वंडली, वडाळा, नांदगाव, गाडेगाव, हातुर्णा तसेच मोर्शी आणि चांदूर बाजार तालुक्यातील शेतशिवारातील संत्री बागांचे तसेच गहू आणि कांदा पिकाचे या गारपिटीने आणि अवकाळी पावसाने नुकसान झाले आहे. काल रात्री दहाच्या दरम्यान या शेतशिवारात विजांच्या कडकडाटात पावसाला सुरुवात झाली. आज गुढीपाडव्याच्या पहाटे साडेचार ते साडेपाच दरम्यान बोरा पेक्षा मोठी तर कुठे आवळ्याच्या आकाराएवढी गार पडल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. सद्यस्थितीत मोसंबी व संत्री बागांमध्ये आंबीया बहराची फळे मोठ्या प्रमाणात आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात मोसंबी व संत्रा बागा बहरल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. मात्र गारपिटीने शेतकऱ्याच्या आशा धुळीस मिळाल्या आहे. या गारपिटीने बागांमधील फळांचे नुकसान झाले आहे. तहसील प्रशासनाला या गारपिटीची माहिती शेतकऱ्यांनी दिली असून तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी तहसील प्रशासनाकडे केली आहे. सध्या काढणीवर आलेल्या गहू आणि कांदा पिकाचे या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे.



**आंबा, लिंबू आणि भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान :** अकोला जिल्ह्यातील पातूर तालूक्यातील मळसुर भागात गारपीटीसह जोरदार वादळी पाऊस झाला . गारपीट आणि पावसामुळं आंबा, लिंबू आणि भाजीपाला पिकांचं मोठं नुकसान झालंय . सलग अर्धा तास वादळी वाऱ्यासह गारपीट आणि मोठा पाऊस झाला . तर दुसरीकडे बुलढाणा जिल्ह्याच्या अनेक भागात जोरदार अवकाळी पावसासह गारपीट झालीय . खामगाव तालुक्यातील रोहणा, गानेशापुर परिसरात गारपीट व वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झालाय .

**परभणी शहरासह जिल्ह्यातील अनेक भागात जोरदार पाऊस :** परभणी शहरासह जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये आज विजांच्या गडगडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली . सकाळपासूनच सर्वत्र उकाडा प्रचंड वाढला होता . त्यातच सायंकाळच्या सुमारास परभणी, पूर्णा, गंगाखेड, पालम या 4 तालुक्यांसह इतर ठिकाणीही जवळपास अर्धा ते पाऊण तास जोरदार पाऊस बरसला . यामुळे परभणीकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे .

**लातूर शहर आणि परिसरामध्ये जोरदार पाऊस :** काही वेळापूर्वी लातूर शहर आणि परिसरामध्ये वातावरण ढगाळ झालं होतं . त्यानंतर जोरदार पावसाला सुरुवात झालीय . मागील दोन दिवसापासून लातूर जिल्ह्यामध्ये उन्हाची तीव्रता वाढली होती . प्रचंड उकाडा जाणवत होता . काही वेळापासून ढगाळ वातावरण तयार झाला आहे . पावसाच्या हलक्या सरीमुळं वातावरणात गारवा निर्माण झालाय . मागील काही दिवसापासून उकाड्यांना हैराण असलेल्या लातूरकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे .